# प्रकरण - दुसरे

## प्रजा परिषद

# प्र क र ण दु स रे

## प्र जा प रि ष द

कोल्हापूर संस्थानातील जनतेत राजकीय जागृती करण्यासाठी " प्रजा परिषद " या संघटनेची स्थापना करून जबाबदार शासन पध्दती व मुद्रण भाषण स्वातंत्र्य या मागण्या मान्य करून घेण्यात माधवराव बागल व इतर नेत्यांनी सुरू केलेल्या चळवळीस यश प्राप्त झाले.

भाई माधवराव बागलांचा जन्म मामलेदारांच्या घरात झाल्यामुळे व मुंबई सारख्या शहरात उच्च शिक्षण पूर्ण झालेले असल्यामुळे त्यांचे जीवन ऐश आरामात जात होते. कलाकार म्हणून ते आपल्या विश्वात रमत होते. पण पुढील काळात ते सामाजिक व राजकीय चळवळीकडे झुकले. यानंतर संस्थानातील सर्वच चळवळीचे नेतृत्व त्यांनी मोठया समर्थपणे केले. बागल या चळवळींच्याकडे आकर्षित होण्याची प्रमुख कारणे पुढील प्रमाणे आहेत.

खंडेराव बागलांच्या आजारपणात रा. ब. आचरेकर या संस्थानातील अर्थ व गृह खात्याच्या मंत्र्यासोबत झालेल्या वादातून माधवरावांना मनस्ताप झाला. दरबारशाही संबंधीची चीड त्यांच्या मनात या प्रसंगाने निर्माण झाली. हे प्रकरण टिंगल स्पाने घेतले गेले तरीही माधवरावांच्या मनावर दीर्घकाल परिणाम करणारे ठरले.[१] या प्रसंगानंतर इतरत्र भटकत फिरण्याऐवजी " हंटर " वृत्तपत्राच्या कामात लक्ष देण्यास भाई बागलांनी सुरुवात केली. वृत्तपत्रातील व्यवस्थापन व संपादन या दोन्ही गोष्टीत त्यांना रस निर्माण होवू लागला. जनतेच्या प्रश्नासाठी संस्थानकावर टिका करण्यास त्यांनी सुरुवात केली.

.....

संस्थानकाने पार्कमध्ये शिकारीसाठी पाळलेल्या हरीण व डुकरांचा परिसरातील शेतकऱ्यांना त्रास होत असे. या प्राण्यांना मारण्याची बंदी होती. त्यामुळे तंबाखू या एकमेव पिकाचे उत्पन्न घेण्यापलिकडे या शेतकऱ्यांना मार्ग नव्हता. अन्नधान्याचे पिक हे प्राणी उध्वस्तच करीत होते. दारुचे धंदे वाढले होते. या संदर्भात संस्थानाबाहेरील वृत्तपत्रातून टीका होवूनही प्रशासन दखल घेत नव्हते. शेतकरी भितीपोटी तक्रार करीतच नव्हते.

या सर्व प्रश्नांचा सविस्तर अभ्यास करुन माधवराव बागलांनी ऑगष्ट १९३० मध्ये " हंटर " वृत्तपत्रातून शासनाविरुध्द टीका करुन जनतेच्यावतीने पुढील मागण्या केल्या.

१. वेठीची वेळ व व्यक्ती निश्चित कराव्यात.
२. जनतेच्या जागृतीसाठी सभा बंदीचा हुकूम रद्द करावा.
३. दारुचे उत्पन्न वाढत चालले आहे ते हळूहळू कमी करावे व प्रतिवर्षी २५ दुकाने बंद करावीत.
४. वेठीच्या अफवा उठल्यामुळे दरबारावर शब्द येतो, तेंव्हा सत्य समोर येण्यासाठी जनतेच्या प्रतिनिधींची चौकशी समिती नियुक्त करावी.
५. पार्कमधील हरीण बाहेर जाणार नाहीत याची काळजी घेण्यांत यावी.
६. गिरणीत कामाचे तास जास्त आहेत तेंव्हा खालसा मुलखातील फॅक्टरी ॲक्ट गिरणीत तात्काळ लागू करावा.
७. संस्थानात जबाबदार शासन पध्दती सुरु करावी.

या मागण्यासाठी जनमत संघटित करण्यासाठी शेतकरी व कामगारांच्या सभा घेवून यामागील भूमिका मांडण्यात आली. बागलांच्या

.....

या मागण्यामुळे संस्थानाने हंटर पत्रावर राजद्रोहाचा खटला दाखल करून न्यायालयातून ५,000/- रूपयांची जामीन भरण्याची नोटीस १७.९.१९30 रोजी बजावली. जामीन न भरण्याचा निर्णय घेवून हंटर वृत्तपत्राच बागलांनी बंद केले. याचवेळी बागलांवर हद्दपारीचा हुकूम बजावला. त्यामुळे ते कांही काळ संस्थानबाहेर गेले.[२]

## गांधीचा प्रभाव :

या काळातच महात्मा गांधीचे कोल्हापूरात आगमण झालेले होते. सत्यशोधक समाजाच्यावतीने त्यांना मानपत्र देण्याचा कार्यक्रम घेण्यात आला. याप्रसंगी बागलासोबत बोलताना गांधीजी म्हणाले की, " आपण चित्रकार आहात या कलेतून जनसेवा घडेल अशीच चित्रे काढा" या वाक्याचा परिणाम बागलावर होवून त्यांनी सक्रीयपणे राजकीय व सामाजिक चळवळीत स्वत:ला झोकून दिले.[३]

## शिरोळ शेतक-यांचा उठाव :

संस्थानातील जनतेला नागरी स्वातंत्र्य मिळावे यासाठी सभा बंदी, भाषण व मुद्रणबंदी उठवावी म्हणून बागलांनी दरबाराकडे अनेकवेळा नागरिकांच्या सह्यांचे निवेदने पाठविली. बैठकात ठराव संमत केले, शिष्टमंडळे पाठवून चर्चा केली. २६.८.१९३८ रोजी बागल, शंकरराव जोशी, मुल्ला यांचे शिष्टमंडळ चर्चेसाठी गेलेले असताना दरबारातील दिवाण सुर्वे यांच्याकडून फारसा प्रतिसाद मिळाला नाही. सनदशिर मार्गाने दरबाराकडून नागरी स्वातंत्र्य मिळणार नाही हे स्पष्ट झाल्यानंतर कोल्हापूरात सभा घेवून कायदेभंग करण्याचा निर्णय भाई बागलांनी घेतला. यावेळी कोल्हापूरांत त्यांना फारसा प्रतिसाद मिळाला नाही. यामुळे पुण्यात जावून सभा बंदी मोडण्याचा निर्णय जाहीर करून ठरलेल्यावेळी कोल्हापूरात पोहचून कायदेभंग

.....

करण्याचा निर्णय बागलांनी घेतला पण या काळातच शिरोळ पेटयातील शेतक-यांनी " शेतसारा कमी करा " शेतसारा ब्रिटीश प्रांता एवढाच ठेवा अशी मागणी सुरु केली. या मागणीसाठी त्यांनी संस्थानाबाहेर " धामणी " या गावी सभा आयोजित केलेली होती. या सभेचे निमंत्रण भाई बागलांना आल्यामुळे पुण्याला जाण्याचा पूर्व नियोजित कार्यक्रम रद्द केला. शिरोळच्या शेतक-यांचा मोर्चा २५ डिसेंबर १९३८ रोजी दहा हजार लोकांसह कोल्हापूरात आला.

या मोर्चाचा वृत्तांत " ज्ञानप्रकाश " वृत्तपत्रांत देण्यात आलेला आहे. या मोर्चासमोर बोलताना माधवराव बागल म्हणाले की, छत्रपतींचा व भगव्या झेंडयाचा पूर्ण आदर ठेवून रयतेच्या मागण्या छत्रपती पुढे मांडण्यासाठी आम्ही आलो आहोत. या मोर्चाने केलेल्या मागण्या पुढील प्रमाणे आहेत.

१. शेतसारा कमी करा व शेतक-यांना कायमची भाकरी मिळेल अशी व्यवस्था करावी.

२. संस्थानातील जनतेला स्वाभिमानाने जगता यावे यासाठी भाषण व मुद्रण स्वातंत्र्यासारखे मुलभूत हक्क देण्यात यावेत,

३. बदलत्या परिस्थितीचा विचार करून संस्थानात जबाबदार शासन पध्दतीचा प्रयोग अंमलात आणण्यासाठी छत्रपतींच्या नेतृत्वाखाली जनतेने निवडलेल्या प्रतिनिधींना सत्तेत सहभागी करून घेण्यात यावे.

शेतक-यांच्या मागण्या सोबतच इतर नागरी स्वातंत्र्यांची मागणी महत्वाची आहे अशी धारणा बागलांची होती. या जबाबदार शासन पध्दतीत छत्रपती इंग्लंडच्या राजासारखा नाममात्र असून सत्ता जनतेच्या प्रतिनिधींच्या हाती असावी अशी मागणी बागलांनी केली. या मोर्चानंतर

.....

बागलासह १०७ ~~सम्यांना~~ जणांना त्यावेळी अटक करण्यांत आली. वरील मागण्यांची पुर्तता व्हावी यासाठी संस्थानातील जनतेनी दरबारावर दोन वेळा मोर्चे काढले. जनतेचा या चळवळीला पाठिंबा मिळत आहे असे चित्र निर्माण झाल्यानंतर बागल व छत्रपती यांच्यांत २३ जानेवारी १९३९ रोजी या मागण्यासंदर्भात वाटाघाटी करण्यांत आल्या. या चर्चेनंतर छत्रपतींनी जनतेच्या पुढील मागण्या मान्य केल्याचे जाहीर केले. संस्थानातील शेतसारा ब्रिटीश हद्दी इतकाच राहील, नागरी हक्क पंधरा दिवसांत जाहीर करण्यांत येतील, राजबंदी असलेल्यांची सुटका करण्यांत येईल व भाषण स्वातंत्र्यावरील बंदी निर्णय उठविण्यांत आले.[४]

या चर्चेनंतर बागलांची सुटका करण्यांत आली. बागलांच्या पुढाकारामुळेच या मागण्या मान्य करून घेण्यात यश प्राप्त झाले. छत्रपतीनी बागलांना म्युनिसिपालीटीचे अध्यक्षपद व इलाखा पंचायतीचे अध्यक्षपद देवू केले पण बागलांनी आपण सत्ता स्विकारणार नाही अशी ठाम भूमिका घेतली.

शेतकऱ्यांच्या या चळवळीचा प्रारंभ ज्वलंत प्रश्नांसाठीच झाला. ज्या प्रश्नाशी जनतेच्या दैनंदिन जीवनाचा संबंध होता, सामान्य तळातल्या शेतकऱ्यांनी ही चळवळ केली. स्वामीनिष्ठ सरदार ,जमीनदार या चळवळीच्या विरोधात होते. कष्टकरी जनतेनी आपल्या संघटित शक्तीच्या जोरावर मागण्या मान्य करून घेण्यात यश प्राप्त केले.

भाई बागलांची सुटका झाल्यानंतर त्यांचा अनेक गांवात सत्कार व सभांचा कार्यक्रम लोकांनी घडवून आणला. दरम्यानच्या काळात शाहु मिल कामगारांच्या प्रश्नासंबंधीही त्यांनी " हंटर " मधून लिखाण केलेले होते.

.....

जनतेच्या प्रश्नांवर संघटितपणे लढा देण्यासाठी व आपण याषूर्वी केलेल्या मागण्यांचा पाठपुरावा करण्यासाठी संघटना स्थापन करणे अत्यंत गरजेचे आहे. हा विचार पक्का करुन संस्थानात " प्रजा परिषद " स्थापन करण्याचा निर्णय माधवराव बागलांनी व त्यांच्या प्रमुख सहका-यांनी घेतला. ही संघटना जबाबदार शासन पध्दती व नागरी स्वातंत्र्य या मागण्याच्या पुर्ततेसाठी संघर्ष करील अशी त्यामागील भूमिका होती.[५]

प्रजा परिषदेची स्थापना :

कोल्हापूर संस्थानात प्रजा परिषदेची स्थापना करण्यापूर्वी १९३१ साली करवीर कॉंग्रेसची स्थापना करण्यांत आली होती. या संघटनेचे अध्यक्षपदही भाई बागलांकडेच होते. संस्थानात कॉंग्रेसची चळवळ करण्यांस गांधीनी अनुमती न दिल्यामुळे बागलानी अध्यक्षपद १९३९ मध्ये वीरमाने यांच्याकडे दिले. संस्थानासंबंधी गांधीनी घेतलेल्या तटस्थ भूमिकेबाबत बागल अस्वस्थ होते. त्यांनी ६-२-१९३९ रोजी जयसिंगपूर येथील श्रीराम ऑईल मिल्समध्ये प्रजा परिषदेच्या स्थापनेसाठी कार्यकर्त्यांची बैठक आयोजित केलेली होती.[६] या बैठकीत रत्नाप्पा कुंभार, दिनकरराव पाटील यांच्यासह दोन हजार कार्यकर्ते उपस्थित होते. बैठकीच्या अध्यक्षपदावरुन भाई बागल बोलत असतानाच कलम १२४ (अ) राजद्रोहाच्या आरोपाखाली पोलिसांनी त्यांना अटक केली. अटकेनंतर दडपशाहीला बळी न पडता चळवळ सुरु ठेवण्याचे कार्यकर्त्यांना आवाहन भाई बागलांनी केले. बागलांच्या अटकेच्या निषेधार्थ लोकांनी हरताळ पाळला. संस्थानात वातावरण बिघडू नये यासाठी १४४ कलम लागू करण्यांत आले.[७]

भाई बागलांनी अटक झाल्यानंतर प्रजा परिषदेचे काम पुढे चालवावे म्हणून कार्यकर्त्यांनी २५-२-१९३९ रोजी पुन्हा जयसिंगपूर येथे

.....

प्रजा परिषदेची बैठक घेतली. या बैठकीत प्रजा परिषदेची तात्पुरती घटना तयार करण्यांत आली. कोल्हापूर संस्थानात छत्रपतींच्या अधिपत्याखाली न्याय व शांततेच्या मार्गाने संपूर्ण जबाबदार शासन पध्दती स्थापन करणे हे प्रजा परिषदेचे प्रमुख ध्येय ठरविण्यांत आले.[८] या बैठकीस कॉंग्रेस वर्कींग कमिटीचे सदस्य शंकरराव देव उपस्थित होते.

याच काळात संस्थानात " करवीर रयत सभा " स्थापन झाली. या सभेची प्रजा परिषदेस विरोध करण्याची व छत्रपतींना समर्थन देण्याची भूमिका घेतली. दरबारचा या सभेस आशिर्वाद होता व ते प्रजा परिषदेवर जातीयवादासारखे खोटे आरोप करीत होते असे परिषदेच्या नेत्यांचे मत होते. या संदर्भात शंकरराव देवांनी प्रजा परिषदेच्या बैठकीत सविस्तर खुलासा करणारे मत मांडले. पुढे रयत सभा फारशी प्रभाव दाखवू शकली नाही.[९] प्रजा परिषदेत सर्व जाती जमातीच्या लोकांचा समावेश मोठ्या प्रमाणावर होता.[१०]

बागलांच्या अटकेनंतर न्यायालयात राजद्रोहाचा खटला दरबाराने दाखल केला. बागलांनी २५ जानेवारी १९३९ ते १ फेब्रुवारी १९३९ या कालावधीत हेर्ले व अन्य ठिकाणी केलेल्या स्फोटक भाषणामुळे राजद्रोह झाला असे आरोप पत्रात नमूद करण्यांत आले होते.[११] भाई बागलांची बाजू न्यायालयात मांडण्यासाठी अॅड. नरीमन यांनी काम केले. बागलांची बाजू मांडताना नरीमन यांनी पुढील प्रमाणे युक्तीवाद केला.

भाई बागल यांच्या खटल्यात एक व्यक्ती विरूध्द दरबार आहे. ब्रिटीश अमदानीत राजद्रोहाचे खटले ज्युरीच्या मदतीने चालतात. तशी या संस्थानात सोय उपलब्ध नाही. न्यायाधिश संस्थानातील यंत्रणेचा एक भागच असल्याने सरकारची अप्रिती उत्पन्न करण्याचा आरोप

.....

असलेल्या व्यक्तीची पूर्वग्रह दुषित चौकशी करणे अशक्य आहे. फिर्यादीने बागलांचे सर्व भाषण विचारात न घेता तुटक वाक्यांचा गैर अर्थ लावून राजद्रोहाचा खटला उभा केलेला आहे. भाषण ऐकणाऱ्या हजारो शेतकऱ्यापैकी एकातही साक्षीदार म्हणून उभे करता आलेले नाही. आरोपीचे भाषण अशिक्षित जनतेच्या मनावर वाईट परिणाम करणारे होते असा कांगावा फिर्यादीने केलेला दिसतो. फिर्यादीच्या बाजूने एकही शेतकरी पुढे येत नाही तर आरोपीच्या बाजूने हेर्ले येथील रामगौंड पाटील यांनी वस्तुस्थिती न्यायालयासमोर मांडली आहे.

भाई बागलांनी आपल्या भाषणात " संघटना करा, एक व्हा, भिती सोडून शांततामय मार्गाने अन्यायाचा प्रतिकार करा " हाच उपदेश केलेला आहे. अन्यायाच्या विरूध्द कायदेभंग करण्याचा किंवा यंत्रणा उलथण्याचा सल्ला त्यांनी दिलेला नाही. पोलिसांचा अहवाल बनावट स्वरूपाचा असून मोहिते व कदम हे दरबारातील नोकरच असल्यामुळे ते साक्षीदार म्हणून उभे केले आहेत. सरकारने बागलांचा जो खोटा अहवाल न्यायालयात सादर केलेला आहे तो जरी मानला तरीही राजद्रोह होवू शकत नाही. शेतकऱ्यांच्या करातून मिळणाऱ्या उत्पन्नावरच दरबारातील मोटारी व चैन चालते यात खोटे काहीच नाही. बागलांची राजाची कल्पना वेगळी व सुधारित आहे. तिचे अधिष्ठान जनतेच्या सार्वभौमत्वावर केलेले आहे.[१२] ॲड. नरीमन यांनी केलेला युक्तीवाद अत्यंत तर्कशुध्द व प्रभावीच होता. बागलांनी वारंवार छत्रपती सोबत चर्चा करून प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न केलेला होता.

या खटल्याचा निकाल २७ मार्च १९३९ रोजी लागून बागलांना दोन वर्षांची सक्तमजूरी व एक हजार रूपये दंड अशी शिक्षा ठोठावण्यात आली.[१३] बागलांनी दंड नाकारल्यामुळे दंडाच्या वसुलीसाठी बागलांच्या

.....

घरातील शाहू महाराजांचा व बागलांचा बेस्टचा पुतळा जप्त करून त्याचा लिलाव लावला पण लिलावाची बोली लावण्यास एकही नागरिक आला नाही. या कृतीचा प्रबोधनकार ठाकरे यांनी "ज्ञानप्रकाश" मध्ये लेख लिहून निषेध व्यक्त केला. पुढे हाच शाहू महाराजांचा पुतळा १९५१ साली बेबी महाराजांच्या हस्ते नगरपालिका सभागृहात बागलांच्या पुढाकाराने बसविण्यात आला.[१४]

शिक्षेनंतरची स्थिती :
================

भाई माधवराव बागलावरील राजद्रोहाच्या खटल्याचा निकाल लागल्यानंतर अवघ्या दोन दिवसानंतर म्हणजे २९ मार्च १९३९ रोजी करवीर दरबारने खास हुकूम काढून संस्थानातील प्रजा परिषद ही संघटना बेकायदेशीर आहे असे जाहिर केले.[१५] बागलांच्या खटल्याचा निकाल जाहीर झाल्यानंतर न्यायालयाच्या आवारातच लोकांनी त्यांचा हारतुरे घालून जयजयकार केला. शहरातील सराफ, कापड दुकानदार व व्यापाऱ्यांच्या संघटनांनी तीन दिवस व्यवहार बंद ठेवून हारताळ पाळला.[१६] बागलांना राजकीय कैदी म्हणून शिक्षा झालेली असली तरीही त्यांना साध्या कैदयाचीच वागणूक मिळाली. रेसकोर्स नाक्यावर जेलमधून कामाला आणले असताना लोकांचा मोठा जमाव तेथे जमून घोषणा सुरु झाल्या तेंव्हा त्वरीत त्यांना जेलकडे नेण्यात आले.[१७] यानंतर कोल्हापूर जेलमधून त्यांना हलवून पन्हाळगडावर ठेवण्यांत आले.

जेलमध्ये असताना बागलांची अशी इच्छा होती की, कार्यकर्त्यांनी प्रजा परिषदेचे कार्य पुढे नेटाने चालवावे, कायदेभंगाची चळवळ हाती घ्यावी पण कार्यकर्त्यांनी उत्साह फारसा दाखवला नाही. कुपवाड येथे

.....

कॉंग्रेस नेते डॉ. पट्टाभि सिताराम यांच्या अध्यक्षतेखाली १५ एप्रिल १९३९ रोजी झालेल्या प्रजा परिषदेच्या अधिवेशनात कायदे भंग चळवळीचा ठराव संमत झाला नाही. कुपवाड हे ब्रिटीश अमदानीत होते. या अधिवेशनात १०,००० प्रतिनिधी उपस्थित होते.[१८] बागलांच्या अटकेनंतर प्रजा परिषदेची चळवळ थंडावली. कुपवाड परिषदेला मोठया संख्येने लोक उपस्थित राहिले व याचा फायदा परिषदेच्या नेत्यांनी करुन घेतला नाही.[१९]

बागलांनी शिरोळच्या शेतकऱ्यांचा मोर्चा आणून कांही मागण्या मान्य करुन घेतल्याच होत्या. पुढे राजद्रोहाच्या खटल्यात शिक्षा झाली. राजाराम महाराजांनी बागलासोबत समझोता करण्याचा प्रयत्न सुरु केला. अटकेनंतर वातावरण बिघडत चालले होते. सतत तीन दिवस लोकांनी मोर्चे काढून सुटकेची मागणी केलेली होती. या काळातच व्हाईसरॉय कोल्हापूर संस्थानला भेट देणार होते. त्यामुळे त्यांच्यापुढे जनतेचा असंतोष प्रदर्शित होवू नये म्हणून शेतकऱ्यांच्या मोर्चानंतर मनात नसतानाही राजाराम महाराजांनी मागण्या मान्य केल्या व नंतर राजद्रोहाचा खटला भरुन प्रजा परिषदेवर बंदीच लादली.[२०]

बागलांची सुटका :
============

नोव्हेंबर १९४० अखेरीस राजाराम महाराजांची तब्येत बिघडली. त्यानंतर त्यांच्यावर मुंबईत शस्त्रक्रिया करण्यांत आली पण त्यातूनही त्यांची ब तब्बेत सुधारली नाही. अखेर २६ नोव्हेंबर १९४० रोजी त्यांचे निधन झाले. त्यानंतर छत्रपती ताराराणी महाराज यांची कोल्हापूर संस्थानचे रिजंट म्हणून ब्रिटीशानी नियुक्ती केली.[२१] त्यांनी अकरा

.....

महिने वय असलेल्या भोसले घराण्यातील शिवाजी राजास दत्तक घेतले. ताराराणींच्याकडे संस्थानचा कारभार आल्यानंतर अल्पावधीतच म्हणजे १८ डिसेंबर १९४० रोजी बागलांची तीन महिन्याची शिक्षा माफ करुन सुटका करण्यांत आली. बागलांच्या सोबत इतरही राजकीय कैदयांची याच काळात सुटका करण्यांत आली.[२२]

कारागृहातून मुक्तता झाल्यानंतर कोल्हापूरातील गंगावेश मैदानावर बागलांच्या स्वागताची सभा झाली. जवळपास १० हजार लोक या दिवशी उपस्थित होते. दरबाराने बंदी वगैरे घातली नाही. या सभेत बोलताना बागल म्हणाले की, छत्रपतींच्या गादीचा सुख लौकिक वाढवावा म्हणून आम्ही कारागृहात सक्तमजूरीची शिक्षा आनंदाने भोगली. या शिक्षेमुळे आमच्या लोकसेवेचा निश्चय मात्र कायम राहिला. जनतेच्या कल्याणासाठी व छत्रपतींच्या किर्तीसाठी कारावासच काय पण फाशी देखिल मोठ्या आनंदाने स्विकारु.[२३]

नगरपालिका निवडणूक :

बागलांनी कारागृहातून सुटका झाल्यानंतर त्यांनी संघटनात्मक बांधणी करुन प्रजा परिषदेला लोक पक्ष बनविण्याचा निर्णय घेतला. १९४१ साली कोल्हापूर नगरपालिकेची निवडणूक होती . ही निवडणूक लढवून संस्था ताब्यात घेण्याचा निर्णय बागलांनी घेतला. या नगरपालिकेत ४० सदस्यात २५ लोकनियुक्त व १५ सदस्य सरकार नियुक्त केले जात. १९४१ पूर्वी लोक प्रतिनिधींची संख्या जास्त असूनही दरबाराच्या प्रभावाखालीच कार्य करीत असत. म्हणून बागलांनी " करवीर स्थानिक स्वराज्य संघ " स्थापन करुन निवडणूक जिंकली. स्वराज्य संघाच्या अध्यक्षपदी बागलच होते. निवडणूक प्रचारात " ऐकी, लोकशाही " या मुद्दयावरच भर दिला.

.....

लोकांनी निवडून देण्याच्या २५ जागा पैकी २२ जागा स्वराज्य संघाने जिंकल्या. ४० जागातही त्यांचे बहुमत प्राप्त झाले. निवडणुकीनंतर नगरपालिका अध्यक्षपदी बागलांचे बंधु वसंतराव बागल यांची एक वर्षासाठी निवड करण्यांत आली. प्रतिवर्षी अध्यक्ष बदलण्याचा निर्णय घेण्यात आला. यामुळे इतरही सहका-यांना संधी उपलब्ध होवू शकेल अशीच भूमिका यामागे होती. [२४]

१९४१ ते १९४८ या कालावधीत झालेल्या करवीर नगर-पालिकेच्या तीन निवडणूकात प्रजा परिषदेला बहुमत मिळाले. लोक नियुक्त सदस्यात १९४१ साली २५ पैकी २२ जागा, १९४५ साली ३० पैकी २८ जागा व १९४८ साली ४० पैकी ३७ जागा प्रजा परिषदेच्या संघास मिळाल्या. १९४८ साली तर ३१ जागा अविरोध मिळाल्या होत्या. [२५]

नगरपालिकेची सत्ता प्रजा परिषदेच्या हाती आल्यानंतर पालिकेतील भंगी, झाडूवाले आदी कर्मचा-यांच्या वेतन वाढीत व निवास, रुग्णालय आदी सोयी उपलब्ध करुन देण्यांत बागलांनी पुढाकार घेतला. दलित समाजातील सोनवणे यांना नगराध्यक्ष करण्यांत बागलांचाच मोठा वाटा होता. शाहू महाराज, आंबेडकर, फुले यांचे शहरात पुतळे उभे करण्यांत बागलांनीच पुढाकार घेतला. या काळातच सावित्रीबाई फुले सुतिकागृह, मुलींचे हायस्कूल काढण्यांत आले. जनकल्याणाचा कार्यक्रम राबविण्यात संघास बागलांनी भाग पाडले. [२६]

## प्रजा परिषदेचे दुसरे अधिवेशन :

१९४१ च्या नगरपालिका निवडणूकीत यश प्राप्त झाल्यानंतर कार्यकर्त्यांना संघटित करुन त्यांचा उत्साह वाढावा म्हणून १ व २ जून १९४२ रोजी कोल्हापूरात प्रजा परिषदेचे दुसरे अधिवेशन आयोजित करण्यांत

.....

आले होते. या अधिवेशनाच्या अध्यक्षापदी बाळासाहेब खेर व स्वागताध्यक्षापदी माधवराव बागल होते. बागलांनी आपल्या भाषणात गरीब जनतेपुढे व्याज, खांड, कर, वेतन हे प्रमुख प्रश्न आहेत ते सोडविण्यासाठी जबाबदार शासन पध्दती मिळविणे हे प्रजा परिषदेचे मुख्य ध्येय आहे असे प्रतिपादन करून संस्थानातील प्रजा परिषादेवरील बंदी दरबाराने उठवावी असे आवाहन केले. या परिषादेतच बागलांची प्रजा परिषादेच्या कार्याध्यक्षापदी निवड करण्यांत आली. प्रजा परिषादेच्या कार्यकारी मंडळाची निवड करण्याचा अधिकार बागलांवर सोपविण्यात आला. बागलांनी कायदे जाणणारे वकील, विद्यार्थी, शेतकरी, धानिक यांचे प्रतिनिधी निवडले. स्थानिक स्वराज्य संस्था हाती आल्यामुळे संघटनेस व्यापारी वर्गातील सहानुभूतीदार आर्थिक मदत देवू लागले होते.

अधिवेशनात भागणी केल्यानंतर अवघ्या दोन दिवसानंतर म्हणजे ५ जून १९४२ रोजी संस्थानातील प्रजा परिषादेवरील बंदी उठविण्यांत आली. ताराराणीने प्रजा परिषादेच्या संदर्भात सौम्य धोरण अंगिकारले होते. [२७]

## ताराराणीचे मानपत्र :

प्रजा परिषादेवरील बंदी उठल्यानंतर भाई बागलांनी महाराणी ताराबाईंना प्रजा परिषादेच्यावतीने मानपत्र देण्याचा निर्णय घेतला. या निर्णयाला कार्यकर्त्यांचा विरोध होता. कारण परिषादेच्या ध्येयाशी विसंगत भूमिका आहे असे त्यांचे मत होते. पण बागलांना मात्र परिषादेच्या कार्यासाठी मानपत्र देणे गरजेचे वाटत होते. ग्रामीण भागातील पाटील, तलाठी, गावगुंड यांच्या भयातून जनतेला मुक्त करण्यासाठी हा कार्यक्रम योग्य वाटत होता.

.....

बागलांनी लिहिलेल्या या मानपत्राच्या देण्याचा कार्यक्रम पार पडला. या मानपत्रात नेहमीप्रमाणे महाराणींची स्तुती नव्हती. पेरी दिवाणाच्या काळात संस्थानातील नोक-यात बाहेरच्या लोकांनाच घेतले जाते तसे न करता कर देणा-या जनतेतील लोक घ्यावेत, दरबारने असंसदीय पध्दतीची लादलेली घटना रद्द करावी, जबाबदार शासन पध्दती अंमलात आणावी अशा मागण्या मानपत्रात केल्या. राजबंदयांच्या दंडाची रक्कम परत करण्याची मागणी ताराराणीने मान्यही केली.[२८] प्रजा परिषदेचे मानपत्र स्विकारुन ताराराणीने प्रजा परिषदेसोबत तडजोडीची भूमिका स्विकारली होती.

## १९४२ चा लढा व प्रजा परिषद :

ऑगष्ट १९४२ मध्ये कॉंग्रेस राष्ट्रीय स्तरावर लढा पुकारणार असे वातावरण निर्माण होत होते. कोल्हापूर संस्थानात कसा प्रतिसाद मिळेल यासंबंधी बागलांना शंका वाटत होती. त्यांनी स्थानिक प्रश्नावर उदा. रेस व बेटींग शॉपवर निदर्शने करुन जागृती निर्माण करण्याचा व संस्थानातील जनतेला राष्ट्रीय चळवळीत सहभागी करण्याचा विचार बागलांनी केला होता. पण ८ ऑगष्ट १९४२ रोजी मुंबईत बिर्ला भवन येथे झालेल्या कॉंग्रेस परिषदेत गांधींनी " चले जाव " ची घोषणा केली. या रात्रीच राष्ट्रीय स्तरावरील नेत्यांची धारपकड सुरु झाली. संस्थानातील जनतेने या लढयात सहभागी व्हावे यासाठी प्रजा परिषदेच्या ~~कार्यकारी~~ कार्यकारी मंडळाची बैठक घेवून निर्णय घेण्याचे ठरविले. दरम्यानच्या काळात ४ ते ५ हजार लोकांनी बागलांना प्रत्यक्ष भेटून " चले जाव " संबंधीची भूमिका काय घेणार अशी विचारणा केली होती.

प्रजा परिषदेच्या कार्यकारी मंडळाच्या बैठकीत आंदोलनात सहभागी होण्यास काही जनांचा विरोध होता. कारण संघटनात्मक स्वरुप

.....

विस्कळीत असल्यामुळे प्रजा परिषद प्रभावीपणे काम करू शकणार नाही अशी त्यांची भूमिका होती. पण बागलांनी सांगितले की, जनतेत जागृती झालेली आहे. राष्ट्रीय चळवळ यशस्वी झाली तर संस्थानातील प्रश्न आपोआप सुटेल. त्यामुळे या लढयात सहभागी होणे गरजेचे आहे. कॉंग्रेसच्या आंदोलनात सहभागी होण्याचा निर्णय कार्यकारी मंडळाने बहुमताने घेतला. या लढयाच्या काळात प्रजा परिषदेचे एक नेते रत्नाप्पा कुंभार मुंबईतच राहिले.[२९] प्रजा परिषदेचा निर्णय १३ ऑगष्ट १९४२ रोजी जाहीर सभा घेवून जनतेला कळविला. या सभेत बोलताना बागलांनी सांगितले की, आपण अखंड भारतातील अविभाज्य घटक असल्यामुळे राष्ट्रीय नेत्यांच्या अटकेनंतर आपण स्वस्थ बसणे बरोबर नाही. संस्थानिकांनीही या चळवळीत सक्रीय व्हावे. ताराराणीला आंदोलनात सहभागी होण्याचे आवाहन बागलांनी केले. सभा झालेल्या रात्रीच बागलांना अटक करून पन्हाळा कारागृहात ठेवण्यांत आले.

## बागलांची सुटका :

बागलांची त्वरीत सुटका व्हावी यासाठी ताराराणी व त्यांच्या अधिकाऱ्यांनी कारागृहात त्यांची भेट घेवून छत्रपतींच्या गादीशी एकनिष्ठ राहून युध्दास विरोध करणार नाही असे लेखी लिहून देवून सुटका करून घेण्याचा प्रस्ताव बागलापुढे ठेवला पण बागलांनी नकार दिला. राजेपदास व युध्दास बागलांचा विरोध नव्हता पण लिहून देणे अपमानास्पद आहे असे त्यांचे मत होते. कॉंग्रेसच्या लढयात सहभागी होवूनही युध्द विरोधी भूमिकेशी बागल सहमत नव्हते.[30] बागलाप्रमाणे इतरही राजकीय कैदयांनी लिहून देण्याचे अमान्य केले. पुढे पेरी दिवाण स्वत: पन्हाळ्यास जावून ३१ एप्रील १९४३ रोजी बागल व इतर राजकीय

.....

कैदयांची बिनशर्त मुक्तता केली. जवळपास साडेसात महिने यावेळी कारागृहात बागलांना राहावे लागले. भूमिगतपणे चाललेल्या चळवळीचा निषेध करण्याची विनंती दरबारने बागलांना केली. कारण बागलांचा या हिंसक चळवळीस विरोध होता पण यावेळी निषेध करणे चळवळीस हानीकारक ठरेल यामुळे बागलांनी जाहीर निषेध करण्याचे नाकारले.[३१]

दरबारच्या घटनेस विरोध :

१९४२ मध्ये करवीर दरबारने असंसदीय विधीमंडळाची घटना जाहीर केलेली होती. त्यावेळी प्रजा परिषदेने या घटनेस विरोध केलेला होता. दरबारने आपल्या घटनेप्रमाणे १३ मे १९४४ ला विधीमंडळाच्या निवडणूका घेण्याचा निर्णय जाहीर केला. या निवडणूकीवर बहिष्कार टाकण्याचे आवाहन करणारे पत्रक बागलांनी प्रसिध्द केले. या पत्रकात त्यांनी पुढीलप्रमाणे आशय व्यक्त केलेला होता. प्रजा परिषदेचे ध्येय राजाच्या अधिपत्याखाली जबाबदार शासन हे आहे. संस्थानाने १९४२ साली आपली घटना जाहीर केली. ही घटना प्रजा परिषदेने नाकारून खोरे समितीने तयार केलेली घटना दरबाराकडे मान्यतेसाठी पाठविली. पण यावर विचार न करताच आपली घटना जनतेवर लादण्याचा दुराग्रह दरबारने चालविला असून त्यानुसार निवडणूक जाहिर केलेली आहे. दरबारी घटना किती टाकाऊ आहे याची कल्पना जनतेला येणे आवश्यक आहे. प्रजा परिषदेने नेमलेल्या खोर समितीने पुढील घटना दरबारापुढे मांडलेली अहोती. " करवीर संस्थानात ब्रिटीशाप्रमाणे राजास प्रतिष्ठा देवून नियंत्रित सत्ता राहील. शासनाची सर्व सत्ता मंत्रीमंडळाकडे राहिल. हे मंत्रीमंडळ बहुमत प्राप्त झालेल्या विधीमंडळातील पक्षाचे असेल, सर्व

.....

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

प्रश्नावर राजास मंत्रीमंडळ सल्ला देईल. त्यानुसार राजाने अधिकार वापरावेत. विधीमंडळाचा विश्वास असेपर्यन्त मंत्रीमंडळ अ सत्तेत राहील. राज्यातील सर्व जाती धर्मांच्या व विचारांच्या हक्कांचे संरक्षण करण्यास हे मंत्रीमंडळ बांधील राहिल. "

खेर घटनेप्रमाणे महाराज व त्यांचे सरकार अहिंसा व निती या तत्वांचा पुरस्कार करुन संस्थानातील प्रत्येक नागरिकास व्यक्ती स्वातंत्र्य, भाषण स्वातंत्र्य, कायद्यात समानता, सवंग व लोकप्रिय न्याय, मोफत व सक्तीचे प्राथमिक शिक्षण, प्रौढ मतदान, समान जीवन वेतन वगैरे देण्याची घटनात्मक तरतुद होती. भारतीय फेडरेशनचा संस्थान एक भाग बनून आपले प्रतिनिधी पाठविल.

खेर समितीच्या वरील सूचना फेटाळून करवीर संस्थानाने जनतेच्या पदरी संतापजनक व सत्ताशून्य घटना बांधली आहे असे ठाम मत बागल व त्यांच्या सहका-यांचे बनले होते.

संस्थानाने जाहिर केलेल्या घटनेप्रमाणे विधीमंडळात ५१ सदस्य होते. त्यातील २६ सदस्य शासकीय नियुक्तच होते. यात सध्याचे विद्यमान मंत्री चार, सरकारी अधिकारी सहा, बिनसरकारी नियुक्त सात, जहागिरदार नियुक्त नऊ अशी विभागणी होती. इतर २५ जागात एक पदवीधर, एक व्यापारी व उद्योग प्रतिनिधी, सरदारांचे दोन, निमसरकारी इलाखा पंचायत दोन, सोसायटयातून एक व इलाख्यातील (करवीर शिवाय) नगरपालिका एक असे आठ प्रतिनिधी विविध क्षेत्राचे प्रतिनिधीत्व करणारे होते. इतर १७ पैकी चार सदस्य सिनियर जहागिरी प्रजेने निवडून द्यावयाची तरतुद होती. फक्त तेराच सदस्य प्रत्यक्ष संस्थानातील जनतेला निवडून द्यावयाचे होते. जनतेच्या प्रतिनिधीला या व्यवस्थेत फारसे स्थानच नव्हते.

.....

शासन व्यवस्थेतील कायदा करणे, न्यायदान व कार्याची अंमलबजावणी करणे या सत्तांचे एकाच व्यक्तीच्या हाती केंद्रीकरण झालेले होते. या सत्तेवर कोणाचेही नियंत्रण राहिले नव्हते. अनियंत्रित सत्ता वापरण्याचा काळ संपत आला असल्यामुळे प्रजा परिषदेने या सत्तेचे रूपांतर लोकशाही प्रक्रियेत करण्याची मागणी केली. खोर समितीच्या शिफारशी दरबारला सादर केल्या पण त्यांचा विचार न करता दरबारने आपलीच व्यवस्था जनतेवर लादली होती.

कायदा करण्याची सत्ता :
=================

कायदे निर्मितीची अंतीम सत्ता विधीमंडळाच्याच हाती असते. असा प्रघात लोकशाही व्यवस्थेत असतो पण संस्थानातील ४२ च्या घटनेत पुढील बाबीवर सरकार व्यतिरिक्त कोणालाही ठराव, कायदा, दुरूस्ती सुचविण्याचा अधिकार असणारच नाही. या बाबी पुढील प्रमाणे आहेत.

१. कोल्हापूर राजघराणे अगर घराण्यातील व्यवस्था.

२. संस्थानचे ब्रिटीश किंवा इतर संस्थानिकासोबतचे संबंध.

३. महाराजांचे ब्रिटीशासोबत केलेले करार.

४. जहागिर, दरबारासोबत असलेले संबंध, जहागिरदार व त्यांच्या नातेवाईकांचे खाजगी वर्तणूक अगर त्यांचे खाजगी खाते व हक्क.

५. संस्थानातील सार्वजनिक कर, ( जमाबंदी )

६. सैन्य व अंगरक्षक

७. महाराजांनी आपल्या राजहक्काने काढलेले हुकूम व ठराव.

८. उच्च न्यायालयाच्या न्यायमूर्तीचे आपल्या कामात जज्ज म्हणून केलेली वर्तणूक.

.....

९. युरोपीयन ब्रिटीश प्रजा.

१०. गुन्हेगारांचे अक्स्ट्रडिशन

११. नाणी करणे.

१२. सार्वजनिक हिताच्या दृष्टीने दरबारने ज्या इतर बाबी कायदे मंडळाच्या कक्षेतून ठेवल्या जातील त्या सर्व

१३. एखादया वर्णाचा धार्मिक हक्क अगर पध्दत.

१४. महाराजांच्या अगर त्यांच्या हुकमतीखाली असलेल्या धार्मिक संस्था अगर देणग्या.

१५. इनामदार यांना त्यांच्या सनदेने मिळालेले हक्क.

१६. विधीमंडळातील सभासदांच्या विशेषाधिकारापैकी शेवटच्या चार हक्कासाठी छत्रपतींची पूर्व पूर्व परवानगी घ्यावी लागेल.

१७. जहागिरीच्या बाबतीत कोणताही कायदा किंवा वटहुकूम जहागिरदाराच्या संमतीशिवाय लागू करता येणार नाही.

१८. कोणताही कायदा किंवा दुरूस्ती बिल पंतप्रधानाच्या संमतीशिवाय मांडता येणार नाही.

१९. पंतप्रधान हेच विधीमंडळाचे अध्यक्ष राहणार असून त्यांच्या संमतीवरूनच ठराव, सुचना, प्रश्न किंवा विधेयक विधिमंडळात मांडण्याचा अधिकार देण्यांत आलेला आहे.

वरील बाबीवरून हे स्पष्ट होते की, जनतेने निवडून दिलेल्या प्रतिनिधीला कोणत्याही सुधारणा घडवून आणणाऱ्या बाबीसंबंधी कायदा करून घेता येणार नाही ते अधिकारवर्चस्व दरबारने राखून ठेवलेले आहेत.

.....

## न्यायदानाची व्यवस्था :

न्यायदानाचे पावित्र्य अबाधित राहण्यासाठी न्याय व्यवस्था कार्यकारी मंडळापासून अलिप्त राहावी, त्यातून निर्भयपणे न्याय देता येतो असा सर्वसाधारण सिध्दांत आढळतो. पण दरबारच्या घटनेत न्यायाधिशाला स्वातंत्र्य नाही. उलट न्यायाधिशांच्या नियुक्तीचा अधिकार सध्याच्या कार्यकारी मंडळाकडेच कायम ठेवण्याची तरतुद करण्यांत आली आहे.

## कार्यकारी मंडळाची सत्ता :

दरबाराच्या घटनेप्रमाणे चार मंत्र्यांची नेमणूक करण्याचा अधिकार दरबाराकडेच आहे. हे मंत्री विधीमंडळाला अंतीम जबाबदार नसून राजालाच जबाबदार राहतील. राजाच त्यांची नियुक्ती करेल.

लोकशाही व्यवस्थेत अशाप्रकारची व्यवस्था असू शकत नाही. मंत्रीमंडळ बहुमतवाल्या पक्षाचे असले तरी ते विधीमंडळास व जनतेस जबाबदार असते.

लोकशाही प्रक्रियेत सरकारच्या अंदाजपत्रक व इतर आर्थिक बाबींवर लोकप्रतिनिधींचे नियंत्रण असते. त्याप्रमाणे प्रतिवर्षीचे अंदाजपत्रक विधीमंडळात मांडून त्यावर अंतीम निर्णय घ्यावा अशी शिफारस खेर समितीची होती. पण दरबारने अंदाजपत्रकावर फक्त चर्चाच करता येईल मतदान करण्याचा अधिकारच असणार नाही असे आपल्या घटनेत नमूद केलेले होते.

वरील विश्लेषणावरुन हे स्पष्ट दिसते की, विधीमंडळ हे सरकारच्या हातातील खेळणे बनणार असून या घटनेवर व निवडणूकीवर बहिष्कार टाकावा असे प्रजा परिषदेने लोकांना आवाहन केलेले होते.

.....

लोकांनी कमीत कमी मते नोंदवून आपला नैतिक पाठिंबा या विधीमंडळास नाही असे दाखविले तर दरबारला आपली घटना रद्द करावी लागेल. प्रजा परिषदेचे लोकशाही शासन पध्दतीचे स्वप्न साकार करण्यासाठी जनतेने कार्यक्रम यशस्वी करावा असे आवाहन करणारे पत्रक माधवराव बागल, म, दु. श्रेष्ठी व रा. दु. बागडे या प्रजा परिषदेच्या प्रमुख नेत्यांनी २० एप्रिल १९४४ रोजी प्रसिध्द केलेले होते.[३२]

बहिष्काराचा कार्यक्रम लोकापर्यन्त पोहोचावा यासाठी इचलकरंजी, शिरोळ, रायबाग, व चिकोडी, गडहिंग्लज, खाडलाट या ठिकाणी जाहीर सभा घेवून बागलांनी मांडला. निवडणूकीचा दिवस बहिष्कार दिवस पाळून जनजागरणासाठी प्रभात फेऱ्यांचे आयोजन करुन लोकांना भूमिका समजून सांगावी.

प्रजा परिषदेच्या बहिष्कार कार्यक्रमास संस्थान बाहेरील जनतेचा व नेत्यांचा पाठिंबा मिळत चालला होता. मुंबई विधीमंडळाचे सभापती मावळकर यांनी पत्र पाठवून बहिष्कार कार्यक्रमास पाठिंबा व्यक्त केला होता.[३३]

प्रजा परिषदेच्या बहिष्कार कार्यक्रमास कोल्हापूरातील मुस्लीम जमायत, हिंदु महासभा, विद्यार्थी संघटना, दलित संघटना आदी संघटनांनी पाठिंबा व्यक्त करुन आपले उमेदवार उभे केलेले नव्हते. स्वतंत्र उमेदवार स्वत:च्याच मर्जीनुसार उभे होते.[३४]

विधीमंडळ निवडणूकीत १६२७३ मतापैकी फक्त २५४९ मतेच स्वतंत्र उमेदवारांना मिळाली. १९४१ च्या नगरपालिका निवडणूकीत १५००० पैकी १३९९२ मते प्रजा परिषदेने मिळविली होती. अत्यल्प

.....

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR

मतदानाचे प्रमाण होवून लोकांनी बहिष्काराचा कार्यक्रम मोठया प्रमाणावर यशस्वी केला.

संघटनात्मक घटना :

निवडणूक बहिष्काराचा कार्यक्रम यशस्वी झाल्यानंतर संस्थानातील प्रजा परिषदेच्या संघटनात्मक बांधणीकडे लक्ष केंद्रीत करण्यांत आले. संघटनेची घटना निश्चित करण्यांत आली.

करवीर छत्रपतींच्या नेतृत्वाखाली संस्थानात शांततेच्या मार्गाने संपूर्ण जबाबदार शासन पध्दती स्थापन करणे हे प्रमुख ध्येय या घटनेत नमूद करण्यांत आले. संस्थानातील सामाजिक, आर्थिक, राजकीय, शिक्षण, आरोग्य विषयक उन्नती करण्यासाठी सातत्याने प्रयत्नशील राहणे हे कार्यक्षेत्र संघटनेच्या घटनेत घेण्यात आले होते.

संघटनात्मक बांधणीसाठी प्राथमिक सभासद ग्रामसभा, तालुका सर्वसाधारण सभा, तालुका कार्यकारी मंडळ, कोल्हापूर शहर सभा, मध्यवर्ती सभा, मध्यवर्ती कार्यकारी मंडळ अशा स्तरावर व्यवस्था करण्यांत आली होती. कार्यकारी मंडळात कार्याध्यक्ष व खजिनदार हे प्रमुख पद होते. आर्थिक हिशोब तपासणीसाठी तपासनीस नियुक्त करण्याचे अधिकार कार्यकारी मंडळाकडे देण्यांत आले होते. प्राथमिक सदस्याला १८ वर्षे वय पूर्ण करणे इतकीच अट ठेवण्यात आली होती. ही घटना ६ फेब्रुवारी १९४५ रोजी मान्य करण्यांत येवून संघटनात्मक बांधणीचे कार्य सुरु झाले.

ताराबाईंचा खटला :

जून १९४५ मध्ये कोल्हापूर संस्थानच्या रिजंट ताराबाई यांच्या विरोधी त्यांना वेड लागलेले आहे म्हणून कोणीतरी खटला दाखल केला.

.....

त्यामुळे ताराराणीच्या जागेवर ब्रिटीश प्रशासक येणार व त्यानंतर प्रजा परिषादेच्या चळवळीस त्रास होणार याची स्पष्ट कल्पना येत होती. १९४५ च्या घटनेत राज्याच्या अधिपत्याखाली जबाबदार शासन पध्दती असावी अशीच भूमिका प्रजा परिषादेने स्वीकारली होती. या दरम्यान ताराराणीची प्रत्यक्ष भेट घेवून परिस्थिती समजून घेण्यासाठी बागलांनी पुढाकार घेतला पण त्यांची भेट होवू दिली नाही.

यानंतर बागलांनी अनेक सभा घेवून ताराराणींची भेट होवू द्यावी व जनतेला सत्य कळू द्यावे अशी मागणी केली. या संबंधीचे ठरावही संमत करुन दरबाराकडे पाठविण्यांत आले. पण त्याचा उपयोग झालाच नाही. शेवटी बागलांनी कोल्हापूरातून निधी जमवून मुंबई उच्च न्यायालयात ताराराणींच्यावतीने दौंडकर नांवाचे वकील दिले. या निधीच्या कामात प्रभाकरपंत कोरगांवकर, डॉ. अप्पा महाजन, अप्पासाहेब पंत यांनी सहकार्य केले. या खटल्याचा मुंबई उच्च न्यायालयाने ताराराणी वेडया नाहीत असा निकाल दिला. या खटल्यावेळी दरबारातील वरिष्ठ अधिकारी, इनामदार, सरदार यांनी ताराराणीला फारसे सहकार्य केले नाही. बागलांची भूमिका आमचा राजाला विरोध नसून जबाबदार शासन पध्दतीत राजा नामधारी असणे गरजेचे आहे म्हणून आम्ही खटल्यात सहभागी होवून राणीसाहेबांच्या बाजूने लढलो अशी होती.[३५]

## बागल व कॉंग्रेस :

भाई बागलांनी १९३१ मध्ये कोल्हापूरात करवीर संस्थान कॉंग्रेसची स्थापना केलेली होती. तिचे अध्यक्ष बागलच होते. पण संस्थानातील लढयात कॉंग्रेस अलिप्तच राहत होती. त्यामुळे फेब्रुवारी १९३९ मध्ये संस्थान

.....

कॉंग्रेसच्या अध्यक्षपदाचा राजिनामा देवून जबाबदार शासन पध्दतीचे राज्य स्थापन करण्यासाठी चळवळ करता यावी म्हणून प्रजा परिषदेची स्थापना करण्यांत आली. प्रजा परिषदेच्या जयसिंगपूर परिषदेत शंकरराव देव उपस्थित राहून जबाबदार शासन पध्दतीच्या मागणीस पाठिंबा व्यक्त केलेला होता.[३६] यानंतर कोल्हापूर येथे जून १९४२ मध्ये झालेल्या दुसऱ्या अधिवेशनाच्या अध्यक्षपदी मुंबई कॉंग्रेस कमिटीचे सदस्य बाळासाहेब खेर होते त्यांनीही प्रजा परिषदेच्या भूमिकेचे समर्थन केले.[३७] ८ ऑगष्ट १९४२ रोजी मुंबईत भरणाऱ्या कॉंग्रेसच्या परिषदेसाठी बागलांना निमंत्रित करण्यांत आले होते. प्रजा परिषदेत मतभेद असतानाही " चले जाव " चळवळीत भाग घेण्याचा निर्णय बागलांनी घेतला. कॉंग्रेसच्या मागणीसोबतच संस्थानातील प्रश्न सुटणार आहे. ब्रिटीशांचे भारत व संस्थान या दोन्हीवरही राज्य आहे. ब्रिटीश भारतातून गेल्याशिवाय कोल्हापूर संस्थान व भारताचा प्रश्न सुटणार नाही म्हणून कॉंग्रेसला पाठिंबा देण्याची भूमिका घेतली. बागलांनी २ ऑक्टोबर १९४५ रोजी गांधी जयंतीच्या दिवशी प्रजा परिषदेच्या ताब्यात असलेल्या करवीर नगरपालिकेवर प्रथमच समारंभपूर्वक तिरंगा झेंडा व भगवा झेंडा जोडीने लावला.[३८] दोन्ही झेंडे लावण्यामागील भूमिका विषद करताना बागलांनी स्पष्ट केले की, प्रजा परिषदेला राजाच्या अधिपत्याखालील जबाबदार शासन पध्दती अभिप्रेत आहे.[३९]

बागलांचे संस्थानातील लढयात लक्ष केंद्रीत झालेले असले तरीही हिंदुस्थानातील स्वातंत्र्य चळवळीशी संस्थानातील प्रश्न निगडीत आहे याची जाणीव ठेवली होती. म्हणूनच त्यांनी १९४६ च्या प्रांतिक कायदे मंडळाच्या निवडणूकीत कोल्हापूर संस्थानाबाहेरील सातारा, पुणे, नाशिक,

.....

सोलापूर, रत्नागिरी या जिल्ह्यात दोन - तीन महिने दौरे काढून अनेक जाहीर सभातून काँग्रेस उमेदवारांचा प्रचार केला. बहुजन समाजावर त्यांच्या भाषणाचा खूप प्रभाव पडल्याचा दिसतो. ४०

संघटना स्वातंत्र्यावर गदा :

ब्रिटीश सरकारच्या सुचनेवरुन कोल्हापूर संस्थानचे दिवाण मिचेल यांनी " पब्लीक सोसायटी ॲक्ट १९४५ " हा कायदा संमत केला. या कायद्यानुसार संस्थानातील संघटना स्वातंत्र्य नष्ट होणार होते. या कायद्यानुसार तीस दिवसांच्या आंत दरबारच्या परवानगी शिवाय नवीन संघटना स्थापन करता येत नाही व त्यापूर्वी अस्तित्वात असलेल्या संस्थांना दरबारची परवानगी घ्यावी लागेल.अशी परवानगी न घेतल्यास ती संस्था बेकायदेशीर ठरविली जाईल. तिला मदत करणा-या व्यक्तीस सहा महिने कैद व ६00/- रुपये दंडाची शिक्षा आणि प्रत्यक्ष संघटनेत भाग घेणा-यांना तीन वर्षे कैद व २000/- रुपये दंड अशी शिक्षा दिली जाईल.

या कायद्याचा मुख्य रोख प्रजा परिषदेवरच होता. म्हणून बागलांनी या कायद्यास विरोध करुन कायदे भंग करण्याचे ठरविले. त्यासाठी अनेक संस्थांच्यावतीने संयुक्तपणे निषेध नोंदविण्यासाठी १५ नोव्हेंबर १९४५ रोजी कोल्हापूरातील बिंदू चौकात जाहीर सभा घेण्याचे जाहीर केले. पण सभेपूर्वीच दिवाण मिचेल यांनी " पब्लीक सोसायटी ॲक्ट ४५"हा कायदा रद्द केल्याचा निर्णय जाहीर केला. जनतेचा असंतोष थांबला तरी बागलांनी हा कायदा रद्द करण्यास जनमताचे हत्यार दाखवून यश प्राप्त केले. ४१

.....

## ग्राम पंचायतीचा प्रयोग :

प्रजा परिषादेच्या ध्येयात जबाबदार शासन पध्दती हे प्रमुख ध्येय असले तरी माधवराव बागलांच्या डोळ्यासमोर शेतकरी-कामकरी राज्याची कल्पना होती. म्हणून त्यांनी १९४६ मध्ये खेड्यातील जनतेत आत्मविश्वास वाढावा व त्यांना जबाबदारीची जाणीव निर्माण व्हावी यासाठी ग्रामपंचायतीचा कार्यक्रम दिला. बागलांनी अनेक खेड्यात ग्रामपंचायती स्थापन करण्यांत पुढाकार घेतला. गावातील लोकांशी चर्चा करून प्रत्येक जातीतील लोकांची बहुमताने ग्रामपंचायतीवर निवड केली. त्यांना अहिंसेचे महत्व पटवून दिले. सावकार, व्यापारी व गावगुंड यांना कटाक्षाने वगळले. ग्रामपंचायतीस विधायक कार्यक्रम दिला. गांवाची स्वच्छता, आरोग्याची काळजी घ्यावी, सेवादल कार्यकर्त्यांची नियमीत प्रभात फेरी, झेंडा वंदन, वृत्तपत्रांचे सामुहिक वाचन, सामुदायिक शेती, सहकारी खरेदी विक्री, न्यायदानात लवादाची भूमिका घ्यावी, दडपशाहीला विरोध, निवाडा न ऐकणा-यावर बहिष्कार, गुंडांचा बंदोबस्त असा कार्यक्रम त्यांनी दिला. असंख्य खेड्यातून हा प्रयोग सुरु झाला. बागने गांवातील ग्रामपंचायत सुरु झाल्यानंतर तिथल्या सावकारांने गांवच सोडले तो कागलला राहिला. त्याच्या दैनंदिन त्रासातून गाव मुक्त झाले.

ग्रामपंचायतीचा प्रयोग सुरु झाल्यानंतर बागलांच्या विरोधात हितसंबंधी गटाकडून वातावरण निर्माण करण्यांत येवू लागले. खरेदी-विक्री संघाचे काम सुरु झाल्यामुळे व्यापारी वर्गातील जैन-लिंगायत दुखावले, आपसातील तंटे गावातच मिटू लागल्यामुळे वकीलांच्या व्यवसायावर परिणाम होण्याची भिती वाटू लागली. अंधश्रध्दा निर्मुलनामुळे भट-पुरोहितांचे

.....

उत्पन्न बुडणार, खेडयातील नेतृत्व उभे राहू लागल्यानंतर उच्चवर्गीय नेतृत्व संपणार असा आभास निर्माण करण्यांत येवू लागला. श्रमजीवी वर्गात बहुसंख्य मराठा समाज असल्यामुळे ग्राम पंचायत प्रयोग सुरू झाल्यानंतर धनिक – पांढरपेशा विरूध्द बहुजन समाज-श्रमजीवी असे वर्गीय स्तरावर विभाजन सुरू झाले. पण या वर्गीय वादीस मराठा-मराठेतर असा जातीय मुलामा देण्याचा प्रयत्न करण्यांत आला. कारण श्रमीक जनतेत मराठा जातीची जनता बहुसंख्यच होती. १९४६ मध्ये राधानगरी भागातील धामोड या गांवी झालेल्या जाहीर सभेत बोलताना बागलांनी सांगितले की, या भागातील बहुसंख्य जनता मराठा जातीची आहे. त्यांना राजकीय कार्यासाठी जाती संघटना करण्याचे कारण नाही. शेतकरी-मजूर संघटना म्हणजे मराठा संघटना होय. [illegible] कॉंग्रेस व प्रजा परिषदेशी प्रामाणिक राहण्याचाच प्रयत्न करा.

या भाषणाचा " विद्या विलासचे" संपादक बाबूराव गोखाले यांनी विपर्यास अर्थ लाऊन वरील भाषणात माधवराव बागलांनी मराठा जातिय संघटना स्थापन करण्यास प्रोत्साहन दिले म्हणून टिका केली. बागलांनी विपर्यास बातमीचा खुलासा पाठवला पण त्यांनी प्रकाशित केला नाही.

ग्राम पंचायत स्थापना होऊ लागल्यापासून प्रजा परिषद व करवीर स्थानिक स्वराज्य संघ या दोन्हीत मतभेद सुरू झाले. दोन्ही संघटनांचे अध्यक्षपद बागलांकडेच होते. मतभेदाला वैतागून बागलांनी आपल्या पदांचे राजिनामे २०-३-१९४६ रोजी संघटनांकडे पाठविले. यानंतर नगरपालिकेतील बहुसंख्य सदस्यांनीही आपल्या पदांचे राजिनामे दिले. यातून परस्परात अंतर वाढू लागले. श्रमजीवी विरूध्द धनिक याला मराठा

.....

मराठेत्तर स्वरूप येऊ लागले. संस्थानिक राजा मराठा असूनही त्याच्या विरोधात बागल लढत राहिले. पण ग्रामपंचायत प्रयोग सुरु झाल्यानंतर मात्र जातीयवादी आरोप झाल्यामुळे त्यांनी वरील पदांचे राजिनामे दिले. राजिनाम्यात मात्र चळवळीवर परिणाम होवू नये म्हणून कार्याच्या व्याप्तीमुळे आपण पद सोडत आहोत असे नमुद केले होते. यापुढेही प्रजा परिषदेचा एकनिष्ठ कार्यकर्ता म्हणून कार्यरत राहु असे पत्रकही बागलांनी राजीनाम्यानंतर प्रसीध्द केले होते. बागलांच्या राजीनाम्यानंतर २४-८-४६ रोजी झालेल्या बैठकीत विरोधकांनीच बागलांनी राजीनामे परत घ्यावेत व तुर्त वादग्रस्त प्रश्न बाजूस ठेवावेत असा ठराव संमत केला. प्रजा परिषदेचे जबाबदार शासन पध्दतीचे स्वप्न साकार करण्यासाठी बागलांच्या नेतृत्वाची गरज होती. हे यावेळी विरोधकांनी देखील मान्य केले. ४२

प्रारंभीच्या काळात प्रजा परिषद्रेतील मतभेद किरकोळ स्वरूपाचे होते. कार्यक्रम व संघटनात्मक स्वरूप या कारणावरून मतभेद वाढत गेले. बागलांच्या ३९ च्या अटकेनंतर संघटनेने एकही कार्यक्रम घेतला नाही. ४२ च्या लढयात सहभागी होण्याचा निर्णय काही जनांना आवडला नाही पण बागलांनी हा निर्णय बहुमताने संमत करून चळवळीस पाठींबा व्यक्त केला होता.

## प्रजा परिषदेचा अंतीम लढा :

कोल्हापूरच्या बाल छत्रपतींचे १-१०-४६ रोजी निधान झाल्यानंतर शाहाजी राजे सत्तेवर आले. या काळात जबाबदार शासन पध्दतीचा लढा तीव्र करण्याचा निर्णय बागलांनी घेतला. या लढयाची पुर्व

......

तयारी म्हणून २४ व २५ मे १९४७ रोजी गारगोटी येथे प्रजा परिषदेचे अधिवेशन आयोजित केले. या अधिवेशनाचे अध्यक्ष व उद्घाटक म्हणून अनुक्रमे काकासाहेब उर्फ न. वि. गाडगीळ व केशवराव जेधे हे दोन मुंबई कॉंग्रेस कमिटीचे नेते उपस्थित होते. या अधिवेशन काळात संघटनात्मक वाद वाढलेला होता. बागल विरोधी गटाने स्वागत समिती सदस्याचे तिकीटे घेतली नव्हती. व्यापारी वर्गातून आर्थिक मदतही मिळाली नाही. या अधिवेशनात काकासाहेब गाडगीळांनी प्रजा परिषदेतील मतभेद मिटविण्यासाठी दोन्ही गटातील समान प्रतिनिधी कार्यकारी मंडळात घ्यावेत अशी सूचना केली. बागलाने ही सूचना मान्य करून विरोधी गटासोबत समझौता केला. पण पुढेही हे मतभेद वारंवार प्रगट होत गेले. सत्ताग्रहण व विलीनीकरण या प्रश्नावर याचे स्वरूप व्यापक बनले.

या अधिवेशनात पुढील प्रमाणे ठराव संमत करण्यांत आला. प्रजा परिषद संपूर्ण प्रजासत्ताक राज्य पध्दती असावी अशा मताची असली तरी तुर्तास ताबडतोब ही प्रजा परिषद असे जाहिर करते की, पुढील मागण्या छत्रपतींनी विनाविलंब मान्य कराव्यात. जसे लोक प्रतिनिधीक संपूर्ण व सर्वस्वी सरकार स्थापन करावे. यासंबंधीची जबाबदारी प्रजा परिषद ही संस्थानातील प्रातिनिधीक संस्था असल्यामुळे तिच्यावर सोपवावी. संपूर्ण जबाबदार शासन पध्दती देण्याची घोषणा करावी व त्याच्या अंमलबजावणीच्या दृष्टीने जरूर तो घटनात्मक कायदा करण्यासाठी प्रजा परिषदेच्या संमतीने घटना समिती नेमून व्यवस्था करावी. घटनेत प्रौढ मतदान व सार्वत्रिक मतदार संघ प्रत्यक्ष निवडणूक या तत्वाचा समावेश करावा. घटना समितीत जाण्याचा निर्णयही ताबडतोब घ्यावा.[४३]

.....

प्रजा परिषदेच्या स्थापनेच्यावेळी व १९४५ च्या घटना शिफारशीत प्रजा परिषदेने जबाबदार राज्य पध्दती राज्याचा सनदशिर दर्जा मान्य केलेला होता. पण या संदर्भात २.६.१९४७ रोजी बोलताना बागल म्हणाले की, राज्याचे अस्तित्वच नको. याशिवाय किसान-मजदूर राज्याची कल्पना साकार होणार नाही. समाजसत्तावादी राज्य व्यवस्था प्रस्थापित केल्याशिवाय बहुजन समाजाला सुख लाभणार नाही. भांडवलदारी, जमीनदारी,सावकारी अस्तित्वात असेपर्यन्त समाजवादी व्यवस्था दृष्टीक्षेपात येणार नाही. पण हा टप्पा एकदम गाठता येणार नाही. म्हणून व्यवहारिक पातळीवर काही तडजोड कराव्या लागतील पण त्या तडजोडी तात्पुरत्या असतील म्हणून परिषदेने हंगामी सरकारची मागणी केलेली आहे.

या अधिवेशनांत बागलांनी चळवळीचे नुकसान टाळण्यासाठी विरोधी गटासोबत समझौता केला. पण हा समझोता मनापासून झाला असे मात्र म्हणता येत नाही. कारण ५ जून १९४७ रोजी बागलांनी " अखंड भारत " या वृत्तपत्रात आपली भूमिका स्पष्ट करणारे पत्रक पुढील प्रमाणे प्रसिध्द केलेले आहे. आतापर्यन्त माझे आयुष्य लोकशाही मुल्यासाठीच झगडण्यात गेले. राजा कोणत्याही जातीचा असो त्याच्या हाती अनियंत्रित सत्ता असता कामा नये हे माझे ठाम मत आहे. पण राजा घालवून त्याच्या ठिकाणी विशिष्ठ वर्गाची किंवा कंपूची सत्ता स्थापण्याची जी धडपड चालू राहिल तिलाही निर्भयपणे विरोध करणे यापुढे मला भाग पडेल. माझे आजपर्यन्तचे आयुष्य शेतकरी-मजूरांच्या हाती राजसत्ता यावी म्हणून घालविले आहे. पण त्यांच्या शक्तीचा व त्यागाचा फायदा घेवून त्यांना लुबाडणा-यानाच जर सत्ता मिळू लागली तर मी हे सहन करणार नाही. राज्याची सत्ता ही खेडूतांच्या

.....

म्हणजे श्रमिकांच्या हाती पडली पाहिजे आणि ती ग्रामपंचायत, आणि ग्रामराज्य या मार्गानेच पडणार आहे. याला विरोध म्हणजे श्रमिकांची प्रतारणाच होय हे मी सहन करणार नाही. यात मी एकाकी पडलो तरी हरकत नाही.[४४]

प्रजा परिषदेचा जबाबदार राज्य पध्दतीचा लढा दरबारशी मतभेद व समझोता होत शेवटच्या टप्प्यात सुरु होता.

ऑगस्ट १९४७ मध्ये दरबारने लठ्ठे कृत प्रतिगामी स्वरूपाची घटना प्रजेच्या पदरी बांधण्याचे ठरविलेले होते. लठ्ठेच्या घटनेत पुढील तरतुद करण्यांत आली होती. दोन कायदे मंडळ राहतील, वरिष्ठ सभागृहात जमिनदार, इनामदारांचे प्रतिनिधी राहतील, एका मतद मतदार संघातून चार उमेदवार निवडावेत पण मतदारांना एकच मत देण्याचा अधिकार राहिल, हंगामी मंत्रीमंडळाची नेमणूक दरबार करेल, घटना दुरूस्तीस दरबाराची संमती घ्यावी लागेल.

प्रजा परिषदेने लठ्ठे घटनेच्या निषेध पाळण्यासाठी २३ जून १९४७ रोजी निषेध दिन पाळून कोल्हापूरात जाहीर सभेचे आयोजन केले. संस्थानभर हा निषेध दिन पाळण्याचा संघटनेने निर्णय घेतला. या निर्णयाचा छत्रपतीवर परिणाम झाला व शाहाजी महाराजांनी बागलांना बोलावून घटनेत विचार विनिमय करून बदल करण्यांत येईल व लठ्ठे घटना कायमची आहे अशी समज करून घेवू नका असे सांगितले. शाहाजी महाराजांनी वाटाघाटीचे धोरण स्विकारल्यामुळे बागलांनी प्रजा परिषदेचा कार्याध्यक्ष या नात्याने पत्रक प्रसिध्द करून निषेधाची सभा रद्द केली. या पत्रकाचा विपर्यास अर्थ घेवून त्याला जातीय स्वरूप देवून वर्धमाने व श्रेष्ठी यांनी बागलांच्या कार्याध्यक्ष पदाचा राजिनामा मागितला. बागलांनी त्वरीत आपला राजिनामा पाठविला. मध्यवर्ती समितीत बागल विरोधकांचे बहुमत असतानाही

.....

राजिनामा परत घेण्याचा आग्रह धरला. कारण सत्ता प्राप्त करण्यासाठी बागलांसारखा बहुजन समाजात दुसरा प्रभावी नेता संघटनेत नव्हता. या काळातच १९४२ मध्ये भूमिगत आंदोलनात भूमिगत झालेले रत्नाप्पा कुंभार प्रगट झाले. त्यानंतर बागल विरोधी गटाच्या कारवायांना जोर चढला.[४५]

शाहाजी महाराजांसोबत वाटाघाटीची चर्चा झाली पण त्यांत यश मिळाले नाही. यामुळे प्रजा परिषदेने निर्णायक लढा देण्याचा निश्चय केला. यासंबंधीचे एक पत्रक २०.१०.१९४७ रोजी प्रसिध्द केले. या पत्रकातील आशय पुढीलप्रमाणे होता. डिसेंबर १९४७ अखेरपर्यन्त दरबारने प्रजा परिषदेची जबाबदारी राज्य पध्दतीची मागणी पूर्ण केली नाही तर सार्वत्रिक हरताळ, सभा, मिरवणूका, निषेधा प्रदर्शने, दारु बंदी, ताडी यातून वाढत जावून साराबंदी व पूर्ण असहकार हा कार्यक्रम प्रजा परिषदेमार्फत राबविला जाईल. हा लढा सुरु झाल्यानंतर बागलांना अटक होईल यासाठी अटकेनंतर कृति समिती कशी असावी व कार्यक्रम कसा असावा यासंबंधी सूचना देणारे दोन बंद पत्रे बागलांनी आपल्या मित्रांच्याकडे देवून ठेवलेले होते.[४६]

## जबाबदार शासन पध्दतीस मान्यता :

वरील पत्रकाचा छत्रपती शाहाजी महाराज व दरबार यांच्यावर अपेक्षित परिणाम झाला व त्यांनी २.११.१९४७ रोजी पुन्हा बागलांना वाटाघाटी करण्यासाठी निमंत्रित केले. या बैठकीत वाटाघाटी होवून शाहाजी महाराजांनी प्रजा परिषदेच्या अधिपत्याखालील जबाबदार शासन पध्दतीची मागणी मान्य केली व प्रजा परिषदेस करवीर संस्थानातील प्रातिनिधीक संघटना म्हणून मंत्रीमंडळ स्थापव|

.....

करण्यांस सांगितले. मंत्रीमंडळ स्थापनेचा १५ नोव्हेंबर १९४७ हा दिवस ठरला. या चर्चेच्यावेळी बागलांसोबत खांडेकर वकील, श्रेष्ठी वकील, वसंतराव बागल व नारायणराव श्रेष्ठी हे प्रजा परिषदेचे प्रमुख नेते उपस्थित होते.

समझोत्याचा मसुदा :

प्रजा परिषद व छत्रपती यांच्यात झालेल्या समझोत्यात पुढील बाबींबाबत तडजोड म्हणून सर्वांनी मान्यता दिली.

१. संस्थानातील सैन्य छत्रपतींच्या ताब्यात राहिल व त्याचा वापर मंत्र्यांच्या सल्ल्यानेच केला जाईल.

२. शासकीय नोकरांची भरती लोकसेवा आयोगाकडून केली जाईल.

३. हिंद सरकार सह व इतर संस्थान सहात महाराजांची संमती हवी.

४. जहागिर व इनामी प्रश्न महसुल मंत्री कायद्याप्रमाणे सोडवतील.

५. निवडणूक घेऊन घटना समिती स्थापन केली जाईल व ती घटना छत्रपती मान्य करतील.

६. दरबारातील पूर्वीचे तीन मंत्री व प्रजा परिषदेचे चार मंत्री आणि पंतप्रधान असे आठ मंत्री असतील. पंतप्रधान चर्चेत भाग घेतील पण मत देणार नाहीत. प्रजा परिषदेच्या मंत्र्यातूनच मुख्यमंत्र्यांची निवड केली जाईल.

या समझोत्यास संमती देण्यासाठी झालेल्या प्रजा परिषदेच्या बैठकीत रत्नाप्पा कुंभार यांनी ठराव मांडला व श्रेष्ठी यांनी अनुमोदन दिले. हा ठराव कार्यकारी मंडळाने एकमताने मान्य केला. हा समझोता होण्यापूर्वी यासंबंधी बागलांनी मुंबई सरकारच्या पार्लमेंटरी बोर्डाचे

.....

सेक्रेटरी यशवंतराव चव्हाण व आमदार घोरपडे यांच्यासोबत चर्चा केलेली होती. प्रजा परिषदेचे ८० टक्के ध्येय या वाटाघाटीमुळे पदरात पडले आहे. राहिलेले उद्दिष्ट टप्प्याटप्प्याने पूर्ण करता येईल अशी प्रतिक्रिया बागलांनी यावेळी व्यक्त केलेली होती. [४७]

प्रजा परिषद सत्तेवर :

शहाजी महाराजांसोबत झालेल्या समझोत्यानंतर राज्य प्रमुख या नात्याने महाराजांच्यावतीने प्रजा परिषदेचे कार्याध्यक्ष म्हणून माधवराव बागल यांना मंत्रीमंडळाची यादी सादर करण्याचे निमंत्रण पत्र हुजूर चिटणीस आर. वाय. चव्हाण यांच्या स्वाक्षरीने ११ नोव्हेंबर १९४७ रोजी पाठविण्यांत आले. [४८]

दरबाराकडून हे पत्र मिळाल्यानंतर प्रजा परिषदेच्या कार्यकर्त्यांसोबत सविस्तर चर्चा करुन बागलांनी सर्व गटातील सदस्य ठेवता येईल अशी दृष्टी ठेवून मंत्र्यांची नांवे निश्चित केली. यात माधवराव बागल हे मुख्यमंत्री राहतील व डी. एस. खांडेकर, रत्नाप्पा कुंभार, श्रेष्ठी हे तीन मंत्री राहतील. यात एक मराठा, एक ब्राहमण, दोन लिंगायत मंत्र्यांचा समावेश करण्यांत आला.होता. सर्व गटाचे प्रतिनिधीत्व व्हावे हा यामागील हेतु होता. अल्पसंख्यांकाना झुकते माप द्यावे ही कल्पना बागलांची असल्यामुळे श्रेष्ठीचे मतभेद असतानाही त्यांचा मंत्रीमंडळात समावेश करण्यांत आला. [४९]

यानंतर रत्नाप्पा कुंभार यांनी वाद उपस्थित केला. बागल विरोधी गटाने त्याला प्रोत्साहन दिले. रत्नाप्पाला गृहमंत्रीपद व श्रेष्ठीना अर्थ व महसुल खाते मिळवावयाची होती. राज्याच्या सत्तेवर वर्चस्व मिळविण्यासाठी ही खाती महत्वाची होती. बागलांनी विरोधकांच्या

.....

मागण्या मान्य केल्या नाहीत म्हणून विरोधी गटातील कार्यकारी मंडळाच्या सदस्यांनी राजिनामे देवून मंत्रीमंडळ बनविण्याचा प्रयत्न सुरु केला. या गटावर मात करण्यासाठी बागलांनी कार्यकारी मंडळाची बैठक बोलावून मंत्रीमंडळाची यादी तयार केली. बैठकीस सात सदस्य उपस्थित होते. या वादामुळे बागलांनी मुख्यमंत्रीपदच अधिकार ग्रहण करण्यापूर्वीच सोडले. मंत्री जनतेचा सेवक असतो यासाठी त्यांनी स्वत: कोरगांवकराकडून कार्यालयाला जाण्यासाठी एक सायकल सुध्दा खरेदी करुन ठेवलेली होती. पण त्यानंतर ते मंत्री बनलेच नाहीत. यानंतर शेवटपर्यंन्त सत्ता कधीही बागलांनी हाती घेतली नाही.[५०]

नव्या मंत्रीमंडळात न राहण्याचा बागलांनी निर्णय घेवून पुढील प्रमाणे मंत्र्यांची यादी व खातेवाटप दरबाराकडे पाठविले. अँड. वसंतराव बागल (मुख्यमंत्री), डी. एस. खांडेकर (महसुल),नारायण सरनाईक (पुरवठा) व कारखानीस टी. एस. (अर्थ) यांचा समावेश होता. या मंत्र्यांच्या नांवास छत्रपतींच्या दरबाराकडून मान्यता मिळून त्यांचा शपथविधीचा कार्यक्रम पार पडला.

संस्थानात मंत्रीमंडळ सत्तेवर आल्यानंतर रत्नाप्पा कुंभारानी प्रजा परिषदेचा आपला वेगळा गट स्थापन करुन बागल विरोधी कारवाया सुरु केल्या. या गटास धनिक लोकांचा सक्रिय पाठिंबा मिळाला. पुढे गांधी हत्यनंतर झालेल्या दंगलीसंबंधी व संस्थान विलीनीकरणाच्या प्रश्नावरुन तीव्र मतभेद झाले. गांधी हत्येच्या दंगलीनंतर शांतता प्रस्तापित करण्यांत मंत्रीमंडळ असमर्थ ठरले. अशी तक्रारही या गटाने हिंद सरकारकडे केलेली होती.

प्रजा परिषदेच्या हाती सत्ता आल्यानंतर संस्थानभर

.....

३०.११.१९४७ रोजी विजयी दिन साजरा करण्यांत आला. जनतेचा सहभाग फार उत्साहजनकच होता.[५१] मंत्रीमंडळाने सत्ता घेतल्यानंतर प्रजा परिषदेचा कार्याध्यक्ष या नात्याने बागलांनी प्रजा परिषदेच्या " समाजवादी समाजरचनेची " मंत्र्यांना आठवण करून देणारे पत्र पाठविले. या पत्रात पुढील प्रमाणे आदेश देण्यांत आला होता.

मंत्र्यांनी प्रत्येक क्षण दलितासाठी खर्च केला पाहिजे. विसावा घेता कामा नये. मुख्यत: अधिकाराचा ताठा अंगी घेता कामा नये. आपणजनतेचे सेवक आहोत हा मंत्र सतत जपला पाहिजे. सत्ता राबवितांना मंत्र्यांनी आपली सत्ता गरीबांच्या कल्याणासाठीच राबविण्याची काळजी घेतली पाहिजे. समाजात गरीब श्रीमंत भेद आहेत. त्यात सातत्याने गरीबांच्या बाजुनेच उभे राहणे हे अधिका-यांचे व मंत्र्यांचे मुख्य कर्तव्य आहे. यावरून माधवराव बागलांची सत्ता कशी वापरावी व सत्ता प्राप्त करण्यामागची वैचारिक दिशा स्पष्ट दिसू लागते.[५२]

## मंत्रीमंडळाचे कार्ये :

प्रजा परिषदेच्या हाती सत्ता आल्यानंतर वसंतराव बागल मंत्रीमंडळाने माधवराव बागलांच्या मार्गदर्शनाखाली पुरोगामी स्वरूपाचे निर्णय अल्पावधीतच घेण्याचा प्रयत्न केला. यात शेतकरी कामगार कल्याणकारी राज्याचे चित्र प्रतिबिंबीत झालेले दिसते. यातील महत्वाचे निर्णय पुढील प्रमाणे आहेत.

१. प्रजा परिषदेच्या चळवळीत हुतात्मे झालेल्या २१ कुटुंबाना ४० रूपयाप्रमाणे २० वर्षे मानधान देण्यांत येईल.

२. राजकीय गुन्ह्यातील सर्व वॉरंट रद्द ठरवून सामुदायिक दंडाची रक्कम व जप्त केलेली जमीन, मालमत्ता परत करण्याचा निर्णय घेतला.

.....

३. एक वर्षांवर तुरुंगात असलेल्या सर्व कैदयांची चार वर्षे शिक्षा माफ करुन चांगली वर्तणूक असलेल्या कैदयांना मुक्त करण्यांत आले.

४. गांधी स्मारकास सरकारने ७ हजार रुपये देणगी दिली.

५. राधानगरी व गारगोटी पेठयातील गरीब धानगर, हरिजन आदींना नाममात्र आकार घेवून ५ हजार एकर जमीन देण्यांत आली व गरीब शेतक-यांचे ५00 रुपयेपर्यन्तचे कर्ज माफ केले.

६. पनोरी-सोळांकूर हा रस्ता तयार करण्यांत आला.

७. संस्थानांत चालू असलेली दशांश धान्य वसुली बंद करुन पूर्वी वसुल केलेल्या धान्यांचा साठा त्याच भागात करुन त्याचा उपयोग त्या भागातील गरीबांना धान्य देण्यासाठी करण्यांत आला.

८. १ जानेवारी १९४८ पासून इचलकरंजी, कागल, जयसिंगपूर येथील रेशनिंग बंद करुन कोल्हापूर शहराखेरीज सर्व संस्थानात धान्याच्या वाहतुकीस परवानगी देण्यांत आली.

९. गुळाच्या ढेपा भांडयात घालण्यासाठी कापडाची आवश्यकता असते. त्यासाठी १५ हजार वार कापड राखीव ठेवून प्रत्येक गु-हाळास २0 वार कापड देण्याची व्यवस्था केली.

१0. पन्हाळा पेटयातील महाडी कवाडी या गावातील घरे आगीने जळाली म्हणून नुकसान झालेल्या सर्वांना लाकूड, धान्य, गवत, दोन महिन्याचे धान्य, प्रत्येकी १0 वार कापड सरकारमार्फत देण्यांत आले.

.....

११. अधिका-यांच्या भरत्या व बढत्यात पूर्वी विचारपूर्वक निर्णय घेतलेला नव्हता. त्याचा गुणवत्तेच्या आधारावर विचार करून कांहीना बढत्या व कांहीना कमी करण्यांत आले.

१२. मंत्र्याच्या पगारातून दरमहा ३००/- रूपये प्रजा परिषदेला देण्याचा निर्णय होऊन दरमहा १२०० रूपये संघटनेस देण्याचा निर्णय घेतला.

१३. संप काळातील कामगारांचा ५५ हजार रूपये पगार कपात झालेला होता. तो देण्याचा निर्णय मंत्रीमंडळाने घेतला.[५३]

वरील निर्णय विचारपूर्वक घेवून मंत्रीमंडळाने आपली प्रतिमा जनमानसात रूजवीण्याचा प्रयत्न केल्याचा दिसतो. या निर्णयामागे माधवराव बागलांची वैचारिक दूरदृष्टी दिसून येते. बागल स्वत: सरकारमध्ये सहभागी झालेले नसले तरीही मंत्रीमंडळावर त्यांचा प्रभाव होता. त्यांच्या सल्ल्याशिवाय मंत्रीमंडळ कोणताही निर्णय घेत नव्हते ही मात्र वस्तुस्थिती होती.

## कोल्हापूर संस्थानचे विलीनीकरण :

१५ ऑगष्ट १९४७ रोजी काश्मिर, जुनागड व हैद्राबाद हे तीन संस्थान वगळता बाकी सर्व संस्थाने परराष्ट्र, वाहतुक व संरक्षण या खात्यांचा कारभार हिंद अगर पाक सरकारकडे सोपवून ते भारत व पाक घटना समितीत सहभागी झालेले होते. कोल्हापूर संस्थानने वरील तत्वाप्रमाणे हिंद सरकारचा एक घटक म्हणून स्वतंत्र राज्य करण्याचे ठरविले यामुळे संस्थानातील आ. बा. लठ्ठे यांना घटना समितीवर पाठविण्यांत आले. [५४]

हिंद वसाहत राज्याचा स्वतंत्र घटक राज्य म्हणून राहण्याची कोल्हापूर संस्थानची पात्राता होती. भारतीय लोक परिषदेत ज्या संस्थानचे

.....

उत्पन्न ५० लाखापेक्षा अधिक आहे अशी संस्थाने हिंद सरकारचे घटक राज्य म्हणून राहू शकतील असे लुधियाना ठरावात म्हटले होते. त्या ठरावाप्रमाणे कोल्हापूर संस्थानच्या अस्तित्वाला धोका येणार नव्हता. कोल्हापूरचे अधिपती मराठा, प्रजाही मराठा आणि प्रमुख पुढाऱ्यात बहुसंख्य मराठा यामुळे विलीनीकरणाची कल्पना कोल्हापूरात मान्य होण्यासारखी नव्हती.[५५]

संस्थानातील मुख्यमंत्री वसंतराव बागल यांच्या नेतृत्वाखाली जबाबदार शासनाचा प्रयोग यशस्वीपणे सुरू होता. त्यांनी अनेक पुरोगामी निर्णय घेतलेले होते. माधवराव सरकारमध्ये नसले तरी मंत्रीमंडळाचा चेहरा त्यांच्या प्रभावामुळेच ओळखला जात होता.ते प्रमुख सूत्रधार होते.[५६]

## गांधी हत्या व मतभेद :

३० जानेवारी १९४८ रोजी महात्मा गांधींची नथूराम गोडसे या हिंदुत्ववादी कार्यकर्त्याने गोळ्या घालून हत्या केली. गांधी हत्येनंतर दुसऱ्याच दिवशी कोल्हापूरात प्रतिक्रिया उमटली. त्यातून दंगलीस प्रारंभ झाला. भालजी पेंढारकर यांचा चित्रीकरण स्टुडिओ जमावाने जाळला. त्यावेळी स्वत: बागल इतके अस्वस्थ बनले की त्यांनी आगीत उडी घेण्याचा प्रयत्न केला पण शाहू मिल कामगारांनी त्यांना आवरले. बागल व मंत्रीमंडळातील सदस्यांनी शहरात फिरून शांतता प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केला. पण या काळात शहरातील ब्राह्मणांची घरे उध्वस्त झालेली होती. त्याच दिवशी पंचगंगा तीरावर लोकांची सभा घेवून गांधीजींच्या अहिंसा तत्वानुसार शांत राहण्याचे आश्वासन घेतले पण त्याच दिवशी चार वाजता हिंदु

.....

महासभेचे कार्यकर्ते डॉ. आपटे यांच्या घराला दंगलखोरांनी आग लावली. त्यावेळी पोलिसांनी केलेल्या गोळीबारात एक व्यक्ती मृत्यु पावली. बागल व मंत्री शांतता निर्माण करण्याचा प्रयत्न करीत होते. त्यांचा दंगल करणे याला जसा विरोध होता तसाच पोलिसांच्या गोळीबाराला विरोध केला. गोळीबारा संदर्भात जिल्हा न्यायाधिश माळी यांची बागलांनी कानउघाडणी केली होती. बागलांनी पत्राक प्रसिध्द करुन जनतेला शांत राहण्याचे आवाहन केले होते. मुंबईहून गांधीजींच्या अस्थि आणून त्याचे पंचगंगेत बागलांनी विसर्जन केले.[५७]

## दंगलीचा आरोप :

मंत्रीमंडळात समावेश न झाल्यामुळे रुष्ठ झालेल्या बागल विरोधी रत्नाप्पा कुंभार गटाने हिंद सरकारकडे बागल मंत्रीमंडळ दंगल थांबविण्यास असमर्थ ठरले तसेच ही जाळपोळ विचारपूर्वक झालेली असून यात बागल मंत्रीमंडळाचा हात आहे अशा तक्रारी करणाऱ्या तारा केल्या व हे सरकार बरखास्त करुन संस्थानाचे विलीनीकरण करावे अशी मागणीही केली. वृत्तपत्रांनी देखील असाच सुर लावला.[५८]

## कोयाजी समिती अहवाल :

कोल्हापूरचे प्रशासक नजाप्पा यांनी गांधी हत्येनंतर झालेल्या दंगलीची चौकशी करण्यासाठी " कोयाजी समिती " नियुक्त केली. या समितीने १७.६.१९४८ ते ७.९.१९४८ या कालावधीत काम पूर्ण करुन आपला अहवाल सादर केला. यांत मंत्रीमंडळातील दरबार नियुक्त मंत्री सर्जेराव माने, बॅ. माने व जाधव हे तीनजन वगळता इतर प्रजा परिषदेच्या चार मंत्र्यांनी दंगलीस प्रोत्साहन देवून गुंडांच्या

.....

गुन्हयाकडे हेतुपुरस्कर दुर्लक्ष केले असे म्हणून त्यांना दोषी ठरविले व भाई बागलांनी ब्राह्मण विरोधी भावना भडकावल्यामुळे गांधी वधानंतरच्या दंगलीत फक्त ब्राह्मणांचीच हानी झाली असे अहवालात नमूद करण्यांत आले होते.[५९]

मध्यवर्ती सरकार संस्थान विलीनीकरणाचा निर्णय घेईल असेच पूर्वीच वाटत होते. कारण मार्च १९४८ मध्ये संस्थान सचिव मेनन कोल्हापूरात येवून गेले होते. त्यांनी चौकशी करुन बागल मंत्रीमंडळ बरखास्त करुन प्रशासक नियुक्त केला जाईल असे जाहीर केले होते.[६0] या दंगलीत शांतता प्रस्तापित करण्याचा प्रयत्न करुनही दंगलीचे खापर बागलांवर फोडण्यांत आले. यांत कारसे तथ्य नाही असे बागलांना वाटत होते.

## विलीनीकरण मतभिन्नता :

दंगली[illegible] नंतर केंद्र सरकारने हस्तक्षेप करुन मंत्रीमंडळ बरखास्त करण्यापूर्वीच मंत्रीमंडळाने राजिनामा दिला. संस्थानात कॅ. व्ही. नजाप्पा यांची प्रशासक म्हणून नेमणूक करण्यांत आली. नजाप्पाने माधवराव बागलांना सुरक्षा कायद्याखाली स्थानबध्द केले. यावेळीच संस्थान विलीनीकरण प्रक्रिया जवळपास पूर्ण झालेली होती. पण जनमताचा कौल न घेता फेब्रुवारी १९४९ मध्ये शाहाजी महाराजाने विलीनीकरणास संमती दिल्यानंतर १ मार्च १९४९ रोजी मुंबई येथे मुंबई प्रांताचे मुख्यमंत्री बाळासाहेब खेर यांच्या अध्यक्षतेखाली मुंबई राज्यात कोल्हापूर संस्थान विलीन करण्याचा कार्यक्रम पार पडला.[६१]

.....

बागलांची भूमिका :

विलीनीकरणाला बागलांचा विरोध होता कारण काँग्रेसने समाजवादी घोषणा केलेली नव्हती. सरदार पटेलासारखो नेते भांडवलदार विरोधी नव्हते. बागलांना कोल्हापूरात समाज सत्तावादी राज्य स्थापन करावयाचे होते.[६२]

मार्च १९४८ मध्ये मेननने मंत्रीमंडळ बरखास्त करण्याचा निर्णय होईल असे जाहीर वक्तव्य करताच मंत्रीमंडळाने स्वत:च राजिनामा दिला. नजाप्पाची प्रशासक म्हणून नियुक्ती केल्यानंतर २२ मार्च १९४८ ला प्रजा परिषदेने एक दिवसाचा निषोध दिन पाळला. पण प्रजा परिषदेने पुढे लढण्याची भूमिका स्विकारली नाही कारण बागलांना भारत सरकारच्याच विरोधात लढावयाचे नव्हते.[६३] पण त्यांनी विलीनीकरण करू नये म्हणून यापूर्वी प्रजा परिषदेच्या कार्यकारी मंडळात २३.२.१९४८ रोजी ठराव संमत केला होता.[६४] ९ मार्च १९४८ रोजी पन्हाळा येथे झालेल्या प्रजा परिषदेच्या अधिवेशनातही असाच ठराव संमत झालेला होता.[६५]

बागल मंत्रीमंडळाच्या राजिनाम्यानंतर भाई बागलांनी मुंबईत सरदार पटेलांची भेट घेवून संस्थान विलीनीकरण करावयाचे असेल तर जनतेची संमती घेवूनच करावे असे सांगितले. यावेळी पटेलांनी संस्थानातील जनता आपल्या विचाराने निर्णय घेईल तो आम्ही मान्य करू असे सांगितले. हे तत्व त्यांनी पुढे मात्र पाळले नाही. राजाच्या संमतीनेच विलीनीकरणाचा अंतिम निर्णय घेण्यात आला.[६६]

कुंभार गटाची भूमिका :

गांधी हत्येनंतर झालेल्या दंगलीस मंत्रीमंडळ जबाबदार असून ते

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.
SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

बरखास्त करावे अशी मागणी रत्नाप्पा कुंभार गटाच्या प्रजा परिषदेने केली. त्यांच्या गटाची ९.३.१९४८ रोजी बैठक होवून विलीनीकरण करण्यासंबंधीचा ठराव संमत करण्यांत आला. बागल गटाच्या विरोधी भूमिका घेण्याचे धोरणच या गटाने अंगिकारले होते.[६७]

## हिंद सरकार व कॉंग्रेसची भूमिका :

हिंद सरकार व कॉंग्रेसची भूमिका तत्वत: लोकांच्या संमतीनेच विलीनीकरण व्हावे अशी होती. देश स्वतंत्र झाल्यानंतर भारतीय संस्थान लोक परिषदेचे अध्यक्ष डॉ. पट्टाभि सितारामय्या यांनी संस्थान हिंद संघराज्यात रहावे की स्वतंत्र रहावे याबद्दलचा प्रजेचा कौल घेवून तो कॉंग्रेसने मानावा असे सांगितले.[६८] पण संस्थान मंत्री सरदार पटेल यांनी हे तत्व पाळले नाही. सोयीने या तत्वाचा वापर केला.

ओरिसा भागात संस्थानातील दंगलीच्याबाबत डिसेंबर १९४७ मध्ये संस्थानिकाकडून मान्यता घेवून त्यांची संस्थाने विलीन केली. तेथे जनतेची संमती घेतली नाही. याउलट दक्षिणेतील जमखांडी संस्थानचे राजे पटवर्धन यांनी सरदारांना पत्र लिहून विलीनीकरण करण्याची संमती दिली. पण त्यांना जनतेचा कौल घेवूनच निर्णय घेतला जाईल असे कळविले. त्यानंतर २१.१२.१९४७ ला जमखांडीत परिषद होवून मुंबई प्रांतात विलीन करण्याचा ठराव संमत करण्यात आला.[६९]

याउलट कोल्हापूर संस्थानात मात्र राजाची संमतीने विलीनीकरण निर्णय करण्यांत आला.[७०] यामुळे बागलांनी जनमताचा आग्रह धरला तर कुंभार गटाने त्याची आवश्यकताच नाही अशी भूमिका घेतली. पण

.....

संस्थानातील बहुसंख्य जनता बागलांच्या निर्णयासोबत होती हे आण्णासाहेब लठ्ठे यांच्या पुढील मतावरून स्पष्ट होते. ते म्हणतात, हिंद संघराज्याचा कोल्हापूर हा पुरेसा मोठा घटक असल्यामुळे तो स्वतंत्र राहू शकतो. कोल्हापूरच्या छत्रपतींच्या गादीबाबत जनतेत विशेष प्रेम व जिव्हाळा आहे. सार्वमत घेतल्यास ते विलीनीकरणाच्या बाजूने पडणार नाही.[७१] भारतीय संस्थान खात्याचे सचिव मेनन म्हणतात, कोल्हापूर संस्थानातील प्रजेकडून विलीनीकरणाबाबत सार्वमताची सूचना येत होती पण सार्वमत घेतल्यास प्रादेशिक वाद निर्माण होईल अशी भिती वाटत होती म्हणून महाराजांच्या संमतीनेच हा प्रश्न निकालात काढण्यांत आला. सार्वमत घेणे केंद्र सरकारला परवडणारे नव्हते असेच दिसते.[७२]

## शहाजी महाराजांची भूमिका :

गांधी हत्येनंतर कोल्हापूर शहरात झालेल्या दंगलीच्या तक्रारीवरून बागल मंत्रीमंडळ बरखास्त करण्याची कार्यवाही शहाजी महाराजांनी करावी अशी इच्छा हिंद सरकारची होती. पण महाराजांनी यासंबंधीचा निर्णय हिंद सरकारनेच घ्यावा अशी भूमिका घेतली.[७३] यानंतरच मेनन कोल्हापूरात येऊन बरखास्तीचा विचार बोलून गेले पण मंत्रीमंडळानेच राजिनामा देऊन प्रशासक नियुक्तीचा मार्ग मोकळा केला. यानंतर नजाप्पा २३.३.१९४८ पासून कोल्हापूर संस्थानचे प्रशासक म्हणून कार्य करु लागले.[७४]

शहाजी महाराजांनी मंत्रीमंडळ बरखास्त करण्याचे केंद्रावर सोपविले होते पण पुढे बागलांची विलीनीकरणासंबंधी सार्वमत घेण्याची मागणी डावलून संमती दिली. हिंद सरकारने प्रतीवर्षाला महाराजांना १० लाख रूपये मानधान देण्याचे मान्य केले होते. महाराजांनी परस्पर

.....

विरोधी भूमिका घेण्याचे कारण म्हणजे त्यांच्या दत्तकाचा एक अर्ज सरकारकडे पडून होता. म्हणून त्यांनी विलीनीकरणास संमती दिलेली असावी असे मत बागलांनी व इतरांनी व्यक्त केले होते.[७५]

प्रजा परिषदेचे विसर्जन :
================

फेब्रुवारी १९४९ मध्ये महाराजांनी संस्थान विलीनीकरणास संमती दिल्यानंतर संस्थानातील प्रजा परिषदेचे अस्तित्व केवळ नाममात्र राहणार होते. प्रजा परिषद केवळ संस्थानापुरतीच मर्यादित असल्यामुळे व्यापक राजकारण करण्याच्या दृष्टीने या संघटनेला मर्यादा पडत होत्या. कॉंग्रेस पक्षात भाई बागलांनी प्रवेश करावा म्हणून मार्च १९४८ मध्ये ते स्थानबध्द असताना त्यांची भेट घेवून मुंबई प्रांत अध्यक्ष भाऊसाहेब हिरे व यशवंतराव चव्हाण यांनी आवाहन केले होते. पण बागलांनी त्यांना नकार दिला होता. कारण बागलांना असे वाटत होते की, कॉंग्रेसने समाजवाद स्विकारलेला नाही. उलट भांडवलदारांचे रक्षण करणारे व साम्यवादाचा कडवट विरोध करणारे सरदार पटेल यांचे वर्चस्व असल्यामुळे पक्षात जावून समाजवाद गट वाढविणे शक्य नाही. या पक्षात बहुजन समाजाचे वर्चस्व नाही. याउलट शेतकरी कामगार पक्षात बहुजन समाजाचे वर्चस्व आहे. त्यांनी शेतकरी कामगारांचे राज्य स्थापन करण्याची घोषणा केलेली होती. त्यासाठी जबाबदार शासन पध्दती हवी होती. म्हणून बागलांनी कोल्हापूरात फेब्रुवारी १९४९ च्या शेवटच्या आठवडयात महाराजांनी संस्थान विलीनीकरणास मान्यता दिल्यानंतर १ मार्च १९४९ रोजी होणाऱ्या विलीनीकरणाची वाट न पाहता सभा घेवून प्रजा परिषदेचे शेतकरी कामगार पक्षात विलीनीकरण करण्याचा निर्णय फेब्रुवारी १९४९ ला जाहीर केला.[७६]

.....

कोल्हापूर संस्थानातील राजकिय विकासाच्या प्रक्रियेत १९३९ ते १९४९ या काळात प्रजा परिषाद या संघटनेचा फार मोठा वाटा आहे. कारण संस्थानात " जबाबदार शासन पध्दती " ची मागणी सातत्याने करुन या संघटनेने जनतेत जागृती निर्माण करण्याचा व लोकशाही मुल्य जीवन प्रणाली म्हणून स्विकारण्याचा आग्रह सातत्याने धारला. संस्थानातील लढयासोबत राष्ट्रीय चळवळीच्या प्रवाहात समरस होण्याचा समन्वय या नेतृत्वानी सांधला. ग्रामपंचायतीच्या प्रयोगाने ग्रामीण भागातील राजकीय जाणीवा निर्माण करुन सत्तेत श्रमिकांना सहभागी करुन घेण्याचा प्रयत्न अत्यंत उपयुक्त ठरला. गांधीवादी व मार्क्सवादी विचारांचा पगडा असलेल्या भाई बागलांच्या विचारातील कल्याणकारी राज्याची कल्पना या संस्थानात प्रजा परिषादेने रुजवीण्याचा या काळातच केलेला दिसतो. प्रजा परिषादेच्या चळवळीमुळे बहुजन समाजातील नवे नेतृत्व उभे राहू शकले हे नाकारता येत नाही.

स्वातंत्र्योत्तर काळात देखील प्रजा परिषादेच्या चळवळीतून पुढे आलेले नेतृत्व आपली पकड ठेवून कार्य करीत राहिले. म्हणूनच प्रजा परिषाद व तिच्या चळवळी राजकीय विकासाच्या प्रक्रियेत अत्यंत महत्वाच्या आहेत. त्याचा संस्थानातील सर्वच क्षेत्रावर खोलवर परिणाम झालेला दिसतो.

=Ø=Ø=Ø=Ø=Ø=Ø=

## संदर्भ सूची

### प्रकरण दुसरे


| | | पान नंबर |
|---|---|---|
| १) | बागल माधवराव, जीवन प्रवाह भाग १<br>राजारामपूरी, कोल्हापूर - १९५४ | ८१ व ८२ |
| २) | उक्त | ८३,१०८,१०९,<br>१११,११३ |
| ३) | उक्त | ८५ |
| ४) | अ) बागल माधवराव जीवन प्रवाह भाग २<br>राजारामपूरी, कोल्हापूर - १९५४<br>ब) पटवर्धन वि. अ. संस्थानातील लोकशाही<br>लढा ,प्रकाशन संस्थानी कचेरी,पुणे १९४० | ६ व ७ |
| ५) | दै. ज्ञानप्रकाश | |
| ६) | अ) बागल माधवराव जीवन प्रवाह भाग २<br>राजारामपूरी कोल्हापूर - १९५४<br>ब) दै. केसरी, सोलापूर ७ मार्च १९८६<br>क) दै. केसरी, दै.पुढारी कोल्हापूर ७ मार्च ८६ | ३७ |
| ७) | बागल माधवराव जीवन प्रवाह भाग-२<br>राजारामपूरी,कोल्हापूर | ३८ |
| ८) | पटवर्धन वि. अ. - उपरोल्लिखित | ४९ |
| ९) | पटवर्धन वि. अ. - उपरोल्लिखित | ५२ |
| १०) | उक्त | ५१ |


.....

| | | |
|---|---|---|
| ११) | बागल माधवराव - उपरोल्लिखित | ३९ |
| १२) | उक्त | ३९ व ४० |
| १३) | उक्त | ४० |
| १४) | उक्त | १८४ व १८५ |
| १५) | पटवर्धन वि. अ. उपरोल्लिखित | |
| १६) | दै. ज्ञानप्रकाश | |
| १७) | बागल माधवराव उपरोल्लिखित | ४१ |
| १८) | पटवर्धन वि. अ. उपरोल्लिखित | ५१ |
| १९) | उक्त | ५२ व ५३ |
| २०) | उक्त | ५२ |
| २१) | अ) बागल माधवराव उपरोल्लिखित | ७६ |
| | ब) प्रा. हेरवाडे श्रीधर " छत्रपती राजाराम महाराज चरित्र "ग्रंथ प्रकाशक चिटणीस छत्रपती राजाराम महाराज प्रतिष्ठान, कोल्हापूर | |
| २२) | बागल माधवराव जीवन प्रवाह भाग-२ राजारामपूरी, कोल्हापूर | ५४ |
| २३) | उक्त | ५५ |
| २४) | उक्त | ५९, ६०, ६१ |
| २५) | बागल माधवराव पडसाद, सेक्रेटरी जीवन कल्याण दिनांक कोल्हापूर शुगर मिल लि. कोल्हापूर १९६५ | ७८ व ७९ |


.....

| | | |
|---|---|---|
| २६) | बागल ज. बा. व बागल च. बा. संपादित<br>विचार संग्रह, राजारामपूरी कोल्हापूर. | ३५ |
| २७) | बागल माधवराव उपरोल्लिखित | ६०, ६१, ६२ |
| २८) | उक्त | ६३, ६४ |
| २९) | उक्त | ६४, ७० |
| ३०) | उक्त | ७८, ७९ |
| ३१) | उक्त | ८०, ८१ |
| ३२) | सा. अखंड भारत २० एप्रिल १९४४<br>संपादक · बागल माधवराव, कोल्हापूर | |
| ३३) | उक्त ११ मे १९४४ | |
| ३४) | उक्त ११ मे १९४४ | |
| ३५) | बागल माधवराव उपरोल्लिखित | ७७, ८० |
| ३६) | उक्त | ११ |
| ३७) | उक्त | ६० |
| ३८) | उक्त | ८०, ८१ |
| ३९) | उक्त | ९२ |
| ४०) | सा. अखंड भारत १४ फेब्रुवारी १९४६<br>सं. मा. बागल माधवराव, कोल्हापूर | |
| ४१) | उक्त २२ नोव्हेंबर १९४५ | |
| ४२) | उक्त २१ मार्च, १९ एप्रिल | |
| ४३) | अ) उक्त ४ जुलै, १९,७,२६ जून १९४६ | |
| | ब) बागल माधवराव उपरोल्लिखित | १२४, १२५ |

.....

४४) सा. अखंड भारत ३ जुलै १९४७
स. बागल माधवराव

४५) बागल माधवराव उपरोल्लिखित १२६, १२७

४६) सा. अखंड भारत १९ जून १९४७

४७) उक्त ६ नोव्हेंबर १९४७

४८) बागल माधवराव पडसाद उपरोल्लिखित ३४

४९) उक्त ३५

५०) बागल माधवराव जीवन प्रवाह भाग २ राजारामपुरी, कोल्हापूर १९५४ १२७

५१) उक्त १३१

५२) विचार संग्रह संपादित बागल ज. बा. व बागल च. ज. राजारामपूरी कोल्हापूर ६४

५३) सा. अखंड भारत १८ डिसेंबर १९४७

५४) पटवर्धन वि. अ. दक्षिण महाराष्ट्रातील संस्थान विलीनीकरण कथा १२२६/५ शिवाजी नगर पुणे १९६६ ६३

५५) उक्त ७६

५६) उक्त ९९

५७) बागल माधवराव उपरोल्लिखित १४६, ५१

५८) उक्त १५४–५७

५९) पटवर्धन वि. अ. उपरोल्लिखित ११०–११

६०) उक्त १००

६१) उक्त ९८–१०२


....

| | | |
|---|---|---|
| ६२) | बागल माधावराव षडसाद, सेक्रेटरी जीवन कल्याण दि कोल्हापूर शुगर मिल लि. कोल्हापूर १९६५ | १८४ |
| ६३) | पटवर्धन वि. अ. उपरोल्लिखित | १०० |
| ६४) | उक्त | ९९ |
| ६५) | बागल माधावराव उपरोल्लिखित | १४६ |
| ६६) | उक्त | १६५ |
| ६७) | पटवर्धन वि. अ. उपरोल्लिखित | ९९ |
| ६८) | उक्त | ८९ |
| ६९) | उक्त | ८९-९० |
| ७०) | उक्त | १०१ |
| ७१) | उक्त | १०२ |
| ७२) | उक्त | १०२ |
| ७३) | उक्त | १०१ |
| ७४) | उक्त | १०२ |
| ७५) | उक्त | १०२ |
| ७६) | बागल माधावराव उपरोल्लिखित | १६६-६८ |

=Ø=Ø=Ø=Ø=Ø=Ø=Ø=Ø=